https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे | अंक –७२ | सोमवार दि.१७ नोव्हेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-72 | Monday, Dt.17 November 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# डॉ. योगेश क्षीरसागरांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोडल्याने बीड जिल्ह्यातील राजकीय गणिते बदलणार ?

## पालकमंत्री अजितदादांची राजकीय इभ्रत मुंडेंच्या नव्हे आता पंडितांच्या हातात..!

**बीड / वैभव स्वामी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील राजकीय समीकरणे बदलली जात आहेत.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अंतर्गत होत असलेली घुसमट सहन न झाल्याने डॉक्टर योगेश क्षीरसागर यांनी अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देत पालकमंत्र्यांना मोठा राजकीय दणका देऊन थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीत प्रवेश केल्याने आता भविष्यात बीड जिल्ह्यातील राजकीय गणिते बदलतील ? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या सर्व बदलत्या राजकीय परिस्थितीत शांत असलेले माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या होत असलेल्या नगरपालिका निवडणुकीत काय भूमिका घेतात ? याकडे देखील आता राजकीय मातब्बरांचे लक्ष लागले आहे. बीड नगरपालिकेत शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी विरुद्ध अजित दादा यांची राष्ट्रवादी काँग्रेस तर योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पार्टी आणि एमआयएम अशी खरी चौरंगी लढत होण्याची शक्यता आहे. बदललेल्या या राजकीय परिस्थितीमुळे विजयी उमेदवार हा विधानसभेप्रमाणे अवघ्या काही मतांच्याच फरकाने विजयी होईल. आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिवस असल्याने नगराध्यक्ष पदासाठी कोणत्या पक्षाकडून कोण उमेदवार येतो ? यावर पुढील राजकीय गणिते निश्चित होण्याची शक्यता आहे.बीड नगरपालिकेत ऐनवेळी आता पालकमंत्री अजित दादांची राजकीय इभ्रत शिवछत्रच्या पंडितांवर येऊन ठेपली आहे. माजी मंत्री धनंजय मुंडे अखेरच्या क्षणी काय भूमिका घेतात ?यावर देखील बरीच राजकीय गणिते अवलंबून राहण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये अंतर्गत वारंवार होणारी मुस्कटदाबी, होणारा टोकाचा विरोध यामुळे वैतागून अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉक्टर योगेश क्षीरसागर यांनी पदासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्यत्वाचा देखील तडकाफडकी

(उर्वरीत पान २ वर)



### बीड नगरपालिकेत चर्चेतही नसलेला भाजपा आता तुल्यबळ पक्ष ठरणार ?

बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला आजपर्यंत कधीच बहुमताने यश मिळाले नाही. एक किंवा दोन नगरसेवकापेक्षा अधिक नगरसेवक अपवादानेच निवडून आले. अजितदादा पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून थेट भाजपा पक्षामध्ये डॉक्टर योगेश क्षीरसागर यांनी प्रवेश करून कमळ या चिन्हावर निवडणूक लढवण्याची घोषणा केल्यामुळे बीड नगरपालिकेच्या हद्दीत चर्चेतही नसलेला भाजपा आता थेट प्रमुख लढतीतला पक्ष म्हणून समोर येईल आणि जर अनअपेक्षित निकाल लागला तर बीड नगरपालिकेच्या राजकीय इतिहासात पहिल्यांदाच भाजपाचे कमळ फुलू शकेल.

## बीड नगर परिषदेत दोन राष्ट्रवादी विरुद्ध भाजपा आणि एमआयएम अशी खरी चौरंगी लढत रंगणार..?

### आ.संदीप क्षीरसागर आणि सय्यद सलीम यांच्यापुढे मोठे आवाहन

पुरोगामी आणि जातीय समीकरणांमध्ये शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभेचे आमदार संदीप भैया क्षीरसागर आणि त्यांना खंबीर साथ देणारे माजी नगराध्यक्ष तथा माजी आमदार सय्यद सलीम यांची बाजू ही इतरांच्या तुलनेत निश्चितच उजवी आहे. बदललेल्या राजकीय समीकरणांमध्ये जर या जोडीने आपली नौका व्यवस्थित पार केली तरच ते नगरपालिका निवडणुकीतील यशाची किनार गाठू शकतील. त्यामुळे नगराध्यक्ष या पदासह ५१ प्रभागांमध्ये नगरसेवक पदासाठी कोणाला उमेदवारी दिली जाते आणि ते उमेदवार आपल्या वरच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला कितपत एक मुठीने चालवतात त्यावर भवितव्य अवलंबून राहणार आहे.



### अन्यथा पंडितांची अवस्था ना घर का ना घाट का ?

माजी आमदार अमरसिंह पंडित गेवराईचे विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांनी गेवराई नगरपालिकेसह बीड नगरपालिकेत देखील अवाजवी हस्तक्षेप केला. त्यामुळे सर्वात तुल्यबळ असलेला अजितदादांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आज बीड नगरपालिकेमध्ये खुळखुळा झाला आहे. आता या खुळखुळ्याला पंडित बंधू ताकद देऊ शकले, ताकतीचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार देऊ शकले ? सर्व प्रभागांमध्ये तुल्यबळ उमेदवार देऊ शकले ? तरच पंडितांची दाळ बीडमध्ये शिजणार आहे. जर पंडितांनी बीड नगरपालिकेच्या हद्दीत लक्ष द्यायला सुरुवात केली तर हक्काच्या गेवराईवर पाणी फिरेल. त्यामुळे आता पंडितांना गेवराई आणि बीड या दोन्ही नगरपालिकेत लक्ष द्यावे लागणार आहे.या दोन्हीकडे लक्ष देताना ना घर का ना घाट का अशी अवस्था जर झाली तर त्याचे खापर मात्र पालकमंत्री अजित दादा यांच्या डोक्यावर फुटणार आहे हे नक्की.

### आज राजकीय लढतीचे चित्र स्पष्ट होणार ?

आज १७ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख आहे.कोणता उमेदवार कोणत्या राजकीय पक्षाकडून नगराध्यक्ष पदासह नगरसेवक पदासाठी अर्ज दाखल करतो. पक्ष कोणत्या उमेदवाराला आपला अधिकृत उमेदवार म्हणून शिक्कामोर्तब करतो.त्यावर खऱ्या अर्थाने राजकीय चित्र स्पष्ट होणार आहे. अर्ज छाननी नंतर कोणत्या उमेदवाराचे अर्ज वैद्य ठरतात आणि कोणत्या उमेदवाराचे अर्ज बाद होतात यावर देखील राजकीय गणिते ठरणार आहेत. त्यामुळे आजचा दिवस हा अंतिम आणि महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

### एमआयएम ठरणार किंग मेकर ?

बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत मुस्लिम मतदार निर्णायक मतदार आहेत.मुस्लिम मतांची विभागणी झाली नाही आणि मुस्लिम मते जर एमआयएम ने एक गठ्ठा घेतली तर बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत अनपेक्षित चित्र समोर येऊ शकते. एम आय एम उमेदवार कोण देतो आणि त्या उमेदवाराच्या पाठीशी मुस्लिम मतदार एक विचाराने राहतो का ? यावर बरीच राजकीय गणिते अवलंबून राहणार आहेत.



### तलवार घेऊन फिरणाऱ्यास अटक

**बीड शहर पोलिसांची धडाकेबाज कारवाई**

बीड ।प्रतिनिधी

दिनांक १६/११/२०२५ रोजी १४:१५ वा. चे सुमारास अजिजपुरा, नूर मस्जिदच्या बाजूला बीड शहरात तलवार घेऊन फिरत असलेल्या व्यक्तीस बीड शहर पोलिसांनी अटक केली

(उर्वरीत पान २ वर)



बीड – भाजपाचे ज्येष्ठ नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांना वाढदिवसानिमित्त झाड भेट देऊन पुढील सर्वांगीण यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा देताना दैनिक समर्थ राजयोग चे संपादक वैभव स्वामी.

## भाजपचे कार्यालय कार्यकर्त्यांसाठी ऊर्जा व प्रेरणेचे केंद्र बनेल – ना. पंकजाताई मुंडे

**छत्रपती संभाजीनगर येथे भाजपच्या कार्यालयाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थाटात लोकार्पण**

छत्रपती संभाजी नगर ।प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाचा पाया हा संघर्षातूनच उभा आहे. अटलजींनी त्या काळामध्ये ना हार मे, ना जीत मे, ना भयभीत किंचित में असे म्हणत ही संघर्षाची बीजं पेरली. त्या संघर्षमय वाटचालीला नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून यश मिळवून देत सुवर्ण




सुवर्णकाळ आणला आहे असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे यांनी केले.

भारतीय जनता पक्षाच्या छत्रपती संभाजीनगर येथील कार्यालयाचे उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले. त्यावेळी ना पंकजाताई मुंडे बोलत होत्या. यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे यांनी भारतीय जनता

(उर्वरीत पान २ वर)

## उपमुख्यमंत्री अजितदादांना सोडचिठ्ठी देत युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागरानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या उपस्थितीत भाजपाचा झेंडा हाती घेतला!

### बाहेरचे लोक बीडमध्ये येऊन लुडबूड करू लागल्याने राष्ट्रवादी सोडून स्वाभिमान जपण्यासाठी भाजपात – डॉ. योगेश क्षीरसागर





बीड ।प्रतिनिधी

नगरपरिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर व डॉ.सारिका क्षीरसागर यांनी छत्रपती संभाजीनगर येथे भाजपात रविवारी (दि.१६) प्रवेश केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत तसेच राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला. क्षीरसागर दाम्पत्याने घेतलेला निर्णय ऐन निवडणुकीच्या तोंडावर अजित पवारांसाठी मोठा धक्का मानला जात आहे.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पर्यावरण व पशुसंवर्धन पंकजाताई मुंडे यांनी क्षीरसागर दाम्पत्याचे भाजपात स्वागत केले. कार्यक्रमाला भाजपचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, नगरसेवक शुभम धूत यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. भाजपमध्ये प्रवेशानंतर प्रतिक्रिया देताना डॉ.योगेश

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# काँग्रेस स्वबळावर!

बिहार निवडणुकीत भाजपचा दणदणीत विजय झाला तर काँग्रेसला दारुण पराभव स्वीकारावा लागला. याचे परिणाम आता राज्याच्या राजकारणावर होताना दिसत आहेत. वेगवेगळ्या स्तरांवर याबाबत चर्चा सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पडसाद उमटताना दिसत आहेत. मुंबईत काँग्रेसने स्वबळाचा नारा दिला आहे. आगामी महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडीसोबत एकत्र न लढता स्वबळावर लढण्याची आग्रही मागणी पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून होत होती. त्याला अनुसरून मुंबईत शनिवारी झालेल्या काँग्रेसच्या शिबिरात यावर शिक्कामोर्तब झाले. मुंबई काँग्रेसचे एकदिवसीय शिबिर अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड उपस्थित होत्या. यावेळी प्रदेशाध्यक्ष सपकाळ म्हणाले, बिहार विधानसभेचे निकाल उलटे लागले असते तर आजचा उत्साह अधिक वाढला असता. पण पराभव झाला म्हणून खचून जाऊ नका. काँग्रेस कार्यकर्त्याने पुन्हा नव्या जोमाने व ताकदीने कामाला लागले पाहिजे. रडायचे नाही तर लढायचे, हा बाणा अंगी बाळगला पाहिजे.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा विजयी झेंडा फडकावण्यासाठी ताकदीने कामाला लागा, असे आवाहन सपकाळ यांनी कार्यकर्त्यांना केले. मुंबई महापालिकेतील सर्व वॉर्डांमध्ये काँग्रेस उमेदवार उभे करण्याची तयारी असल्याचे मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खा. वर्षा गायकवाड यांनी सांगितले. त्या म्हणाल्या, लक्ष्य २०२६ साठी मुंबई काँग्रेसचे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. स्थानिक पातळीवर आघाडीबाबत निर्णय घ्यावा असे पक्षाने आम्हाला कळवले होते. येत्या काळात मुंबईत स्वबळावर लढले पाहिजे ही आमची भूमिका आहे. याशिवाय जे आमच्या समविचाराचे पक्ष असतील, त्यात आरपीआय गट अथवा राष्ट्रवादी काँग्रेस यांच्याशीही आम्ही या आघाडीबाबत चर्चा करू. राजकीय वर्तुळात मात्र यावर चांगलीच चर्चा रंगली आहे. बिहारच्या निवडणुकीनंतर हा निर्णय घेतला असावा का? उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची युती काँग्रेसला खटकली का? यावर चर्चा होत आहे. परंतु याबाबत कुठलाही दावा अद्याप तरी काँग्रेसकडून करण्यात आलेला नाही. त्यामुळे यावेळच्या निवडणुकीत कोण कोणावर भारी पडणार ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

मुंबईतील काँग्रेसच्या कट्टर समर्थकांची मते कुठेही जाणार नाहीत. मात्र मनसेला सोबत घेऊन मुंबई महानगरपालिकेची निवडणूक लढवली तर दलित, उत्तर भारतीय, मुस्लिम मतदारांच्या नाराजीला सामोरे जावे लागेल. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेची निवडणूक स्वबळावर लढण्याचा निर्णय काँग्रेस पक्षाने घेतला असावा.

# विद्यार्थी- पालक- शिक्षक या त्रिसूत्री वर शैक्षणिक संकुलाचे नाव उज्ज्वल आहे - वसंतराव देशमुख गुरुजी

## श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात ५३ वर्षानंतर विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न

माजलगाव ।प्रतिनिधी

१९६६ ते १९७२ या दरम्यान दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा (स्नेह बंध ते मैत्री बंध) माजी विद्यार्थी मेळावा आज मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी उदघाटन सत्राचे अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ हेमंत वैद्य, व्यासपीठावर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, शाळेचे पहिले मुख्याध्यापक आदरणीय वसंतराव देशमुख गुरुजी, माजी मुख्याध्यापक लक्ष्मणराव आघाव गुरुजी, तत्कालीन शिक्षक र. ब. देशमुख गुरुजी, वि. ब. देशमुख गुरुजी, विठ्ठलराव जाधव गुरुजी, गंगाधर दलाल, प्रभुअप्पा क्षिरसागर, श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, कार्यवाह अड विश्वास इत्यादी उपस्थित होते.

या मेळाव्याची सुरुवात सांघिक पद्य, दिपप्रज्वलन व माता सरस्वती, भारत माता, पंच परिवर्तन प्रतिमेचे पूजन करून झाले. यानंतर १९६६ ते १९७२ दरम्यान तत्कालीन दिवंगत शिक्षक - विद्यार्थी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक लक्ष्मणराव आघाव गुरुजी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन करताना पहिले मुख्याध्यापक वसंतराव देशमुख गुरुजी यांनी सांगितले की, पालक - विद्यार्थी व शिक्षक यांच्या योगदानानेच श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाने आपले नाव उज्ज्वल केले आहे. आज आपले सर्वांचे वय ७० पेक्षा अधिक आहे या परिस्थितीत आपले शारीरिक आरोग्य, कौटुंबिक सौख्य कसे अबाधित ठेवावे याविषयी मौलिक मार्गदर्शन केले. या मेळाव्याची भुमिका माजी विद्यार्थी, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड यांनी या मेळाव्याची कल्पना, आयोजन व तयारी याविषयी माहिती दिली. यावेळी अध्यक्षीय समारोप संस्थेचे कार्यवाह डॉ हेमंत वैद्य यांनी केले. प्रास्ताविक करताना केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे यांनी सांगितले की, माजी विद्यार्थी हा शाळेचा, संस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. आभार ब्रीजमोहन सोनी यांनी मानले तर सुत्रसंचलन प्रा. डॉ. रमेश गटकळ यांनी केले. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड






**बीड - भाजपाचे ज्येष्ठ नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना लोकजगतच्या संपादक शेख आयेशा.**


**तहसीलदार मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**
जा.क्र.२०२५/एम ए जी /कावि- १०८४
दिनांक : -/-/-
वाचा :- जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम-२०२३
**अर्जदार रेहान रईस पठाण रा.टाका ता.अंबड जि.जालना**

**जाहीर प्रगटन**

कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनता **टाका ता.अंबड जि.जालना** यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, **रेहान रईस पठाण रा.टाका ता.अंबड जि.जालना** येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे **श्री/श्रीमती/कु/नातू स्वतः रेहान रईस पठाण** यांची त्यांनी जन्म ची **दिनांक:-१६/०२/२००६** ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तहसीलदार मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**
जा.क्र.२०२५/एम ए जी /कावि- १०२६
दिनांक : -/-/-
वाचा :- जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम-२०२३
**अर्जदार रूबिना उस्मान शेख रा.टाका ता.अंबड जि.जालना**

**जाहीर प्रगटन**

कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनता **टाका ता.अंबड जि.जालना** यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, **रूबिना उस्मान शेख रा.टाका ता.अंबड जि.जालना** येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे **श्री/श्रीमती/कु/नातू स्वतः रूबिना उस्मान शेख** यांची त्यांनी जन्म ची **दिनांक:-०१/०५/१९९१** ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तहसीलदार मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**
जा.क्र.२०२५/एम ए जी /कावि- १०८३
दिनांक : -/-/-
वाचा :- जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम-२०२३
**अर्जदार रईस मन्सुरखाँ पठाण रा.टाका ता.अंबड जि.जालना**

**जाहीर प्रगटन**

कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनता **टाका ता.अंबड जि.जालना** यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, **श्री रईस मन्सुरखाँ पठाण रा.टाका ता.अंबड जि.जालना** येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे **श्री/श्रीमती/कु/नातू मुलगा नामे फरहान रईस पठाण** यांची त्यांनी जन्म ची **दिनांक:-२०/१०/२०१०** ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तहसीलदार मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**
जा.क्र.२०२५/एम ए जी /कावि- ८९७
दिनांक : -/-/-
वाचा :- जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम-२०२३
**अर्जदार करीम बुढण शेख रा.टाका ता.अंबड जि.जालना**

**जाहीर प्रगटन**

कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनता **टाका ता.अंबड जि.जालना** यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, **श्री करीम बुढण शेख रा.टाका ता.अंबड जि.जालना** येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे **श्री/श्रीमती/कु/नातू मुलगी फरजाना करीम शेख** यांची त्यांनी जन्म ची **दिनांक:-१५/०७/१९८६** ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तहसीलदार मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**
जा.क्र.२०२५/एम ए जी /कावि- १०२४
दिनांक : -/-/-
वाचा :- जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम-२०२३
**अर्जदार जावेद उस्मान शेख रा.टाका ता.अंबड जि.जालना**

**जाहीर प्रगटन**

कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनता **टाका ता.अंबड जि.जालना** यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, **श्री जावेद उस्मान शेख रा.टाका ता.अंबड जि.जालना** येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे **श्री/श्रीमती/कु/नातू स्वतः जावेद उस्मान शेख** यांची त्यांनी जन्म ची **दिनांक:-३०/०१/१९८८** ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तहसीलदार मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**
जा.क्र.२०२५/एम ए जी /कावि- १००३
दिनांक : -/-/-
वाचा :- जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम-२०२३
**अर्जदार सिकंदर बद्रु शेख रा.टाका ता.अंबड जि.जालना**

**जाहीर प्रगटन**

कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनता **टाका ता.अंबड जि.जालना** यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, **श्री सिकंदर बद्रु शेख रा.टाका ता.अंबड जि.जालना** येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे **श्री/श्रीमती/कु/नातू मुलगी सादिया सिकंदर शेख** यांची त्यांनी जन्म ची **दिनांक:-०३/०७/२००३** ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**


पान १ वरुन...

**भाजपचे कार्यालय ....**

पक्षाच्या संघर्षातून सुवर्णकाळाकडे झालेल्या वाटचालीची थोडक्यात प्रभावी मांडणी केली. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की,भारतीय जनता पक्षाने त्या दशकांमध्ये पक्ष वाढीसाठी मोठा संघर्ष केला. मात्र आज तोच पक्ष संपूर्ण भारतात यशस्वी झालेला आहे. त्या दशकातील पक्ष वाढीसाठी खस्ता खाल्लेल्या सर्व नेत्यांचे हे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खरे करून दाखवले आहे. बिहारमध्येही आपल्याला प्रचंड यश मिळाले आहे. आता कोणतेच राज्य असे राहणार नाही जिथे भाजपाची पूर्ण सत्ता नसेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातूनही भाजपाला तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपद मिळाले आहे. प्रत्येक कार्यकर्त्याचे स्वप्न होते की तिसऱ्यांदा भाजपचा मुख्यमंत्री झाला पाहिजे. देवेंद्र फडणवीस यांनी ते पूर्ण केले आहे. आज प्रत्येक जिल्ह्यांमध्ये भारतीय जनता पक्षाचे कार्यालय उभी राहत आहेत. ही कार्यालय केवळ कार्यालये न राहता ती निश्चितच प्रत्येक कार्यकर्त्याला ऊर्जा देणारी केंद्रे होणार आहेत. मराठवाड्यातील एक कार्यालय भाजप कार्यकर्त्यांसाठी ऊर्जा केंद्र होणार असून या ठिकाणाहून प्रत्येकाला निश्चित ऊर्जा मिळेल भाजपा रुजवण्यासाठी वाढवण्यासाठी त्या दशकातील आपल्या प्रमोद महाजन असो किंवा मुंडे साहेब असो यांनी पक्षाच्या बाबतीत पाहिलेले स्वप्न पूर्ण होत आहे याचा प्रचंड आनंद होत आहे. येणाऱ्या काळात नगरपालिका पंचायत समिती जिल्हा परिषदांमध्येही देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आपल्याला भरघोस यश मिळवायचे आहे. त्यासाठी सर्वांनी काम कामाला लागावे असे आवाहनही यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केले.

**उपमुख्यमंत्री अजितदादांना....**

क्षीरसागर म्हणाले, पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर पंकजाताई मुंडे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आम्ही भाजपमध्ये प्रवेश केला. स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने तयारी सुरू होती. आता आम्ही भाजपच्या कमळ चिन्हावर निवडणूक लढणार आहोत. बीड नगरपरिषदेसाठी जागा महिलांसाठी राखीव आहे, त्यानुसार आम्ही निवडणूक लढवू. भाजप आणि आमचे कार्यकर्ते एकत्रितपणे काम करतील. राष्ट्रवादी सोडण्यामागे काही कारणे होती, आता मोकळा श्वास घेत असल्याचेही त्यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले, बाहेरचे लोक बीडमध्ये येऊन वेगवेगळ्या निवडणुकीत प्रयोग करत आले, परंतु बीडकरांनी ते सातत्याने हाणून पाडले. हा प्रयोगही बीडकर हाणून पाडतील आणि स्वाभिमान जपतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

निवडणुकीसाठी भाजप संपूर्ण ताकद देणार

डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह भाजप पदाधिकाऱ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे ह्या संपूर्ण ताकद देणार असून खंबीरपणे पाठीशी उभा

पान १ वरुन...

राहणार असल्याचा शब्द देखील त्यांनी दिला आहे.

**तलवार घेऊन ...**

असून त्याच्याकडून चार तलवारी जप्त करण्यात आल्या आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड शहर पोलिसांकडून अवैध शस्त्र धारकांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. सदरील व्यक्ती शेरसिंग हिंदू सिंग टाक, वय अंदाजे ५५ वर्ष, रा. वडवणी, ता.वडवणी जि.बीड असून त्याच्याकडून आणखीही अवैध शस्त्रे मिळण्याची शक्यता आहे.पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी सर्व पोलिस ठाणे प्रमुखांना निवडणूक काळात अवैध शस्त्रे जप्त करण्याचे आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने बीड शहर पोलिसांनी तत्परता दाखवत ही कारवाई केली आहे.बीड शहर पोलिसांकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, कोणाकडेही अवैध शस्त्र, तलवार, दारुगोळा किंवा गावठी पिस्तूल असल्याची माहिती असल्यास मो. ७५८८०७७७४ किंवा पीएसआय महेश जाधव - मो.९०२१२१६२५६ यावर कळवावे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार व पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय श्री. खेडकर, पीएसआय श्री. महेश जाधव, श्री. गणेश कुमावत तसेच पोलिस अंमलदार गहिनीनाथ बावनकर, राम पवार, सुशेन उगले, इलियास शेख यांनी केली आहे.

**डॉ. योगेश क्षीरसागरांनी....**

राजीनामा दिला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष, नगरसेवकांच्या अंतिम मुलाखतीपर्यंत योगेश क्षीरसागर हे अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत होते. मात्र बीड नगरपालिकेत शिवछत्रच्या पंडितांनी अवाजवी लक्ष घातले. त्यातच क्षीरसागरांना वैतागलेल्या माजी नगरसेवकांनी मोठ्या संख्येने शिवछत्र चा आश्रय घेतल्यामुळे क्षीरसागरांचे धाबे दणाणले होते. मात्र एकाच पक्षात असल्यामुळे पंडितांना ते विरोध करू शकत नव्हते. या घडामोडीमुळे डोक्यावरून पाणी जाऊ लागल्याने त्यांनी अजित दादांना निर्वाणीचा इशारा देत बीड नगरपालिकाच्या निवडणुकीमध्ये सर्वस्वी अधिकार हे नैतिक जबाबदारी म्हणून योगेश क्षीरसागर यांच्याकडे द्यावी असा आग्रह दस्तूर खुद्द योगेश यांनीच धरला. याला शिवछत्रच्या पंडितांसह त्यांच्याकडे गेलेल्या आणि इच्छुक असलेल्या उमेदवारांनी टोकाचा विरोध केला. यावर अजितदादांनी तोडगा काढण्याचा प्रयत्न केला मात्र तो निष्फळ ठरला. त्यामुळे योगेश क्षीरसागरांनी आपली राजकीय चूल वेगळी मांडण्याचा झटपट निर्णय घेतला.हा निर्णय इतका झटपट झाला की इच्छुक उमेदवारांच्या झोपा उडाल्या आहेत. सर्वच अस्थिर झाले आहेत. प्रामुख्याने योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली जे मुस्लिम उमेदवार मुस्लिम मतदार ज्या ठिकाणी मोठ्या संख्येने आहेत अशा वार्डातील मुस्लिम उमेदवारांची मोठी पंचायत ऐन

पान १ वरुन...

निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात झाली आहे. त्यांना आता शिवछत्रचाही आसरा घेता येत नाही आणि भाजपाचे कमळ हातात घेता येत नाही. त्यामुळे हे उमेदवार अपक्ष म्हणून लढणार ? का त्यांना योगेश क्षीरसागर पाठबळ देणार ? की त्या ठिकाणी कमळाच्या चिन्हावर ताकतीचा पर्यायी उमेदवार योगेश क्षीरसागर देणार हे आज स्पष्ट होईल. अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये मोठी फाटा फूट झाली आहे. दुसरीकडे शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर आणि त्यांना खंबीर साथ देणारे माजी आमदार सय्यद सलीम यांची ताकद आता आणखीनच वाढणार आहे. यामुळे शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे आता इच्छुकांची गर्दी आहे त्यापेक्षा चार पटीने वाढली आहे.आता या इच्छुक उमेदवारांची नाराजी दूर करून त्यांना आपलंसं करण्यात यश मिळवतात का. यावर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला यश मिळू शकते अन्यथा तोंडाशी आलेला घास थोडक्यात हिरावून जाण्याची शक्यता देखील नाकारता येणार नाही. दुसरीकडे अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची जबाबदारी ऐन वेळेला माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या खांद्यावर येऊन पडलेली आहे. तिकडे गेवराईत पवार आणि पंडित एकत्र आल्यामुळे या पंडितांची आधीच मोठी पंचायत झालेली आहे. त्यात आता बीडची भर पडल्यामुळे तारेवरची कसरत करताना या पंडितांना नगरपालिका निवडणुकीत कमालीची कसरत करावी लागणार आहे. जर गेवराईसह बीड नगरपालिकेत सुद्धा पंडितांना यश मिळाले नाही तर विद्यमान पालकमंत्री अजित दादांची राजकीय इभ्रत वेशीला टांगली जाईल आणि जर यश मिळवण्यात बाजी मारली तर पंडित बंधू अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सर्वेसर्वा म्हणजेच बाजीगर ठरतील. जे की येणाऱ्या आगामी निवडणुकांमध्ये बीड जिल्ह्यातील अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामधीलच माजी मंत्री धनंजय मुंडे यांना देखील चपराक देणार ठरेल.त्यामुळे गेवराई सह बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत माजी मंत्री धनंजय मुंडे नेमकी काय भूमिका घेतात हे पाहणे देखील मोठे औत्सुक्याचे ठरणार आहे.

बीड नगरपालिका निवडणुकीत एमआयएम पक्षाला नगण्य समजून चालणार नाही. त्यामुळे बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, अजित दादा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, भारतीय जनता पार्टी आणि एम आय एम अशी चौरंगी खरी लढत रंगणार आहे.या लढतीमध्ये एकनाथराव शिंदे यांची शिवसेना, उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना आणि काँग्रेस आय पक्ष त्याचबरोबर इतर स्वबळावर लढणारे राजकीय पक्ष काय भूमिका घेतात ?आणि त्यांना त्यांचा मतदार कितपत साथ देतो यावर बरीच विजयाची आणि पराभवाची राजकीय गणिते ठरणार आहेत.

# ३१ वेठबिगारांची जिल्हाधिकारी व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जनसाहस यांच्या संयुक्त विद्यमाने सोडवणूक

बीड ।प्रतिनिधी

जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात जबरदस्तीने वेठीबिगारीला जुम्पल्या गेलेल्या ३१ जणांची सुटका जिल्हाधिकारी बीड, तसेच जिल्हा निधी सेवा प्राधिकरण आणि जनसाहस यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आली. माजलगाव तालुक्यात केली कार्यवाही सर्व नागरिक या आदिवासी समाजाचे असून त्यांच्याकडून गत तीन महिन्यापासून बळजबरीने काम करून घेतल्या जात होते मारहाण व धमकी होत होते अशी तक्रार त्यांच्या नातेवाईकांनी केल्यानंतर न्या आनंद यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी बीड व न्या. वाहब सय्यद सचिव जिल्हा विधिसेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली ३१ कामगारांची सुटका करण्यात आली.




यावेळी गौरव इंगोले उपविभागीय अधिकारी माजलगाव संतोष रुईकर तहसीलदार माजलगाव तत्त्वशील कांबळे अधिकार मित्र जिल्हा विधिसेवा प्राधिकरण बीड, बालक कोळी पोलीस निरीक्षक माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन कामगार कामगार विभागाचे अजय लव्हाळे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

आज सर्व कामगारांची जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी भेट घेतली त्यांची समस्या जाणून घेतली व त्यांना शासकीय योजना विषयी माहिती दिली मुलांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना कराव्या लागतील यासाठीची माहिती दिली. तसेच सर्व कामगार जळगाव जिल्ह्यातील असल्यामुळे तेथील जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधून मुलांना शिक्षणाची व्यवस्था करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.तसेच न्या. वाहब सय्यद यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जळगाव यांच्याशी संपर्क साधून या सर्व कामगारांना कायदे विषयक मोफत मधून मिळवून देण्याचे आश्वासित करण्यात आले.



अंबाजोगाई - ग्रामपंचायत कार्यालय पाटोदा येथे आदिवासी जननायक क्रांतिवीर बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करताना प्रदेश सचिव राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस महाराष्ट्र अविनाश उगले,सुदाम उगले,विलास उगले,सतीष घोडसे,महारूद्र हौसेकर आदी.

# पाली व येळंबघाट गणातील तांदळ्याची वाडीत कॉर्नर बैठक संपन्न

बीड ।प्रतिनिधी

पाली जिल्हा परिषद सर्कल आणि येळंब घाट पंचायत समिती गणातील तांदळ्याचीवाडी येथे आयोजित करण्यात आलेली कॉर्नर बैठक मोठ्या उत्साहात व उपस्थितीत संपन्न झाली. या बैठकीत स्थानिक प्रश्न, विकासकामे, शैक्षणिक व आरोग्यविषयक गरजा तसेच मूलभूत सुविधांबाबत सविस्तर चर्चा झाली. बप्पासाहेब घुगे यांना पाली जिल्हा परिषद सर्कल मधील ग्रामस्थांमधून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



**बप्पासाहेब घुगे यांना पाली जिल्हा परिषद सर्कल मधील ग्रामस्थांमधून उत्स्फूर्त प्रतिसाद**

बैठकी दरम्यान बप्पासाहेब घुगे यांनी गावकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी, अपेक्षा आणि प्रलंबित मागण्या जाणून घेतल्या. गावकऱ्यांनी रस्ते, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, शेतीसंबंधी समस्यांबाबत मोकळेपणाने मते मांडली. घुगे यांनी या सर्व प्रश्नांवर सकारात्मक प्रतिसाद देत स्थानिक विकासाला प्राधान्य देण्याचे आश्वासन दिले.तांदळ्याच्या वाडीतील नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती पाहून विकासाची इच्छाशक्ती अधिक दृढ झाल्याचे बप्पासाहेब घुगे यांनी सांगितले. लोकांच्या विश्वासाला उतरून त्यांच्यासाठी काम करणे हीच माझी प्राथमिकता आहे, असेही ते म्हणाले.

कॉर्नर बैठकीमुळे गावकऱ्यांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण झाल्याचे दिसून आले असून येळंब घाट परिसरातील विकासासाठी या संवादातून सकारात्मक दिशा मिळाल्याची भावना लोकांतून व्यक्त होत आहे.

# बीड पोलीस संघाची पदकांची लयलूट

बीड ।प्रतिनिधी

दि. ११/११/२०२५ ते १४/११/२०२५ या कालावधीत छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या ३६ व्या परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धेत बीड जिल्हा पोलीस दलाने उल्लेखनीय कामगिरी करत एकूण द्वितीय पारितोषिक मिळवून जिल्ह्याचा मान उंचावला आहे.



विशेष म्हणजे यंदा पुरुष गटाबरोबरच महिला गटातही बीड पोलिसांनी द्वितीय क्रमांक पटकावण्याचा ऐतिहासिक निकाल साध्य केला आहे. बीड जिल्हा पोलीस दलाने महीला व पुरुष संघांनी एकुण ५८ पदकांची कमाई करुन परिक्षेत्रातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. पोलीस अधीक्षकांचे खेळाडूंना थेट मैदानावर प्रोत्साहन खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी एक आगळा वेगळा उपक्रम राबवत पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी स्वतः फुटबॉल संघात सहभागी होत खेळाडूंचे मनोबल उंचावले. त्यांच्या उपस्थितीमुळे संघांमध्ये उत्साहाचे नवे संचार झाले. पुरुष संघाची दमदार कामगिरी बीड जिल्हा पोलीस दलाच्या पुरुष संघाने विविध क्रीडा प्रकारांमध्ये उल्लेखनीय यश मिळवले.पुरुष खेळाडूंनी अत्यंत शिस्तबद्ध, जिद्दी आणि कौशल्यपूर्ण खेळ सादर करत जिल्ह्याचा गौरव वाढवला.

महिला संघाची ऐतिहासिक कामगिरी

यंदा बीड जिल्हा पोलीस दलाकडून पहिल्यांदाच महिला कबड्डी संघ पाठविण्यात आला होता. या नव्याने स्थापन झालेल्या संघाने अनेक अनुभवी संघांना कडवी झुंज देत उत्कृष्ट प्रदर्शन केले, ही बाब विशेष कौतुकास्पद ठरली. महिला गटातील उल्लेखनीय कामगिरी पुढीलप्रमाणे- यावर्षीच्या परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धेत सर्वोत्कृष्ट महिला ऍथलिट हा मान बीड जिल्हा पोलीस दलाच्या महिला अंमलदार शिल्पा नाहोरकर यांनी पटकावला असून त्यांना ॲक्टीव्हा दुचाकी हे विशेष पारितोषिक प्रदान करण्यात आले. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीने बीड जिल्हा पोलीस दलाचा नावलौकिक वाढविला आहे.

मागील ७-८ वर्षांनंतर बीड जिल्हा पोलीस दलाने परिक्षेत्रीय पातळीवर इतकी चमकदार कामगिरी केली आहे. बक्षीस वितरण समारंभ मा. विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. वीरेंद्र मिश्र यांच्या हस्ते संपन्न झाला. या प्रसंगी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी सर्व विजेत्या व सहभागी खेळाडूंना मनःपूर्वक अभिनंदन करून भविष्यात आणखी उत्तुंग यश मिळविण्यासाठी शुभेच्छा दिल्या.सदर अभिमानास्पद कामगीरी सर्व खेळाडूंनी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर मार्गदर्शनाखाली व संघ व्यवस्थापक राखीव पोलीस निरीक्षक श्री. पांडुरंग दलाई,

# शिवा संघटनेच्या लोहा तालुकाध्यक्ष पदी रविराज होळगे बेरळीकर यांची निवड

लोहा ।प्रतिनिधी

शिवा संघटनेच्या लोहा तालुकाध्यक्ष पदी रविराज होळगे यांची एकमताने निवड करण्यात आली असून, त्यांच्या नियुक्तीचे सर्वत्र स्वागत होत आहे. कट्टर कार्यकर्ते म्हणून ओळख असलेले रविराज होळगे हे शिवा संघटनेचे निष्ठावान आणि सक्रिय पदाधिकारी असून, संघटनेच्या माध्यमातून त्यांनी अनेक उपक्रम यशस्वी रित्या राबवले आहेत.महात्मा बसवेश्वर महाराजांची जयंती लोहा तालुक्यात त्यांनी भव्य आणि दिमाखात साजरी करून समाजात ऐक्य, संस्कार आणि प्रबोधनाचा संदेश दिला होता. तसेच विविध सामाजिक आणि संघटनात्मक कार्यक्रमांमध्ये त्यांनी दाखविलेल्या नेतृत्वगुणांमुळे त्यांचा लौकिक वाढला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊनच संघटनेच्या उच्च पदाधिकाऱ्यांनी त्यांच्यावर तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आहे. या महत्त्वपूर्ण निवडी प्रसंगी शिवा संघटनेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष तसेच सेवा जनशक्ती पार्टीचे पक्षप्रमुख प्रा. मनोहर धोंडे सर, शिवा संघटनेचे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस धन्यकुमार शिवनकर, सेवा जनशक्ती पार्टीचे राष्ट्रीय प्रवक्ते विठ्ठल ताकबिडे सर आणि अनेक मान्यवर कार्यकर्त्यांची प्रमुख उपस्थिती होती.



रवी होळगे हे शिव-पार्वती समूहाचे उद्योजक* असून समाजातील विविध घटकांमध्ये मिळवलेले त्यांचे संपर्क, बाजारपेठेची जाण आणि जनहिताचे भान यामुळे त्यांची कामगिरी विशेषत्वाने उल्लेखनीय ठरते. संघटनेच्या पुढील कामकाजात तालुक्याची कार्यक्षमता आणि विस्तार वाढवण्याची क्षमता त्यांच्यात असल्याचा विश्वास वरिष्ठांनी व्यक्त केला आहे. रविराज होळगे यांची तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, आगामी काळात लोहा तालुक्यात शिवा संघटनेचे कार्य अधिक प्रभावी आणि गतिमान होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# सुभेदार रामजी बाबा, वस्ताद लहुजी साळवे व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या संयुक्त जयंतीदिनी विनम्र अभिवादन

बीड ।प्रतिनिधी

आपल्या खंडप्राय देशाच्या राष्ट्रीय प्रगती करता व सर्व थरातील समाजाकरता झटणाऱ्या आदर्श महापुरुषांच्या विचारांची उजळणी करून त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवण्याकरता सर्व थोर महापुरुषांच्या जयंती, स्मृतिदिन संपन्न करण्याकरता सतत प्रयत्नशील असणाऱ्या महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालय बीड यांनी वाचनालयाचे मुख्य केंद्र असलेल्या मित्र नगर येथील वाचनालयात सुभेदार रामजी बाबा, क्रांतिकारकांचे गुरु वस्ताद लहुजी साळवे व स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची संयुक्त जयंतीदिनी विनम्र अभिवादन करण्यात आले.



या थोर महापुरुषांच्या जयंतीच्या पूर्वसंधेला महामानव अभिवादन ग्रुप संचलित मोफत शिकवणी वर्ग जय भीम बुद्ध विहार, आम्रपाली बुद्धविहार डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर (पुरग्रस्त कॉलनी) व राजगृह बुद्ध विहार (मोंढा रोड) येथील गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. वाचनालयाच्या मुख्य कार्यक्रमाला अध्यक्षपदी सेवानिवृत्त सीईओ पी.व्ही. बनसोडे साहेब लाभले होते तर जी.एम. भोले एड. तेजस वडमारे, काशीनाथ वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.ह्याप्रसंगी समाजसेवक प्रशांतजी वासनिक व कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी देखील सुभेदार रामजी बाबांनी डॉक्टर बाबासाहेबांना घडवण्याकरता घेतलेल्या अपारपष्टाबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.एम. राऊत यांनी केले तर प्रास्ताविक प्रा. अशोक गायकवाड यांनी केले आभार प्रदर्शन डी.जी. वानखेडे यांनी व्यक्त केल. कार्यक्रमाकरिता आयुष्यमती गंगुबाई वानखेडे यांनी बहुमोल परिश्रम घेतल



# कळंब तालुक्यातील शिराढोण पोलीस स्टेशन अंतर्गत व्यापारी मित्राचे बैठक संपन्न

कळंब ।प्रतिनिधी

दिनांक १५ नोहेबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता पोलीस स्टेशन शिराढोण तालुका कळंब येथे बैठक पार पडली. पोलीस निरीक्षक धरणेदर कोळेकर,उपनिरीक्षक परमेश्वर पवार, बीट अमलदार शेळके साहेब यांच्या उपस्थित बैठक मध्ये व्यापारी वर्गाशी संवाद साधण्यात आला. सर्वांना चोरी फसवणूक घरफोडी चोऱ्या बाबत सतर्क केले स्वतःहून काही प्रतिकात्मक उपयोजना करण्याचे आव्हान केले. सीसीटीव्हीचे महत्व सांगून सर्वांना एक कॅमेरा नागरिकांसाठी लावण्याचे आवाहन केले. रात्रगस्त पेट्रोलिंगचे ग्रस्त बाबत चर्चा करून व्यापारी वर्गाचे सूचना व अडीअडचणी ऐकून घेतल्या. काही संशयित व्यक्ती हालचाली माहिती वगैरे असल्यास तात्काळ पोलीस ठाणे येथे कळविण्याचे आव्हान केले. सर्वांनी पोलीस प्रशासनचे सूचने प्रमाणे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम लवकर हाती घ्यावे असे आव्हान शिराढोण पोलीस स्टेशन अंतर्गत करण्यात आले आहे. यावेळी व्यापारी संघटनेचे वरून पाटील, विष्णुदास काळे, विकास कोंडेकर, कलीम भाई बागवान, गणेश पांचाळ, आकाश धाकतोडे, गणेश शिंदे, अल्ताफ शेख, अझहर शेख, खोडसे बंधू आदी व्यापारी उपस्थित होते.

# कल्याणस्वामी संस्थांनचा कलशारोहन सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह

नामांकित कीर्तनकार हजेरी लावणार,

भाविकांनी लाभ घ्यावा - कीर्तनकार सोनाली दीदी

बीड ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील श्रीक्षेत्र कल्याणस्वामी संस्थानच्या मंदिराचा भव्य कलशारोहण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह, ११ कोटी नामजप, त्रिकाल हरिपाठ कार्यक्रमाचे दिनांक १८ नोव्हेंबर पासून आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध, नामांकित कीर्तनकाराच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती, श्रीक्षेत्र कल्याणस्वामी संस्थानच्या अध्यक्षा रामायणाचार्य ह.भ.प. साध्वी सोनाली दिदि यांनी दिली. यावेळी संस्थांचे उपाध्यक्ष तथा महंत ईश्वर स्वरूप चैतन्य महाराज यांची उपस्थित होती. याप्रसंगी बोलताना साध्वी सोनाली दीदी म्हणाल्या, श्रीक्षेत्र कल्याण स्वामी संस्थान हे गेल्या पाचशे वर्षां पूर्वीचे जुने संस्थान आहे. या ठिकाणी वंशपरंपरागत नववी पिढी आज अध्यात्मिक, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात कार्य करत आहे.

संस्थांनचा जीर्णोद्धाराचे काम हाती घेण्यात आले असून अद्यावत दगडी मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. कल्याण स्वामी संस्थान मंदिराचा कलशारोहन व अखंड हरिनाम सप्ताह निमित्त सांप्रदायातील मान्यवर, नामांकित दिग्गज संस्थानला भेटी देणार आहेत.



कलशारोहन कार्यक्रमासाठी नवसारी, सुरत येथील स्वामी श्रीहरी जीवनदास शास्त्री संस्थापक श्रीनारायण मुनी दिव्यधाम, महंत गुरुवर्य महंत शिवाजी महाराज, नारायणगड, न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री, भगवानगड, महामंडलेश्वर महादेवानंद भारती अश्वलिंग संस्थान, महंत विठ्ठल महाराज शास्त्री, गहीनाथ गडकर, शांतीब्रह्म ह.भ.प. नवनाथ बाबा, गोरक्षनाथ टेकडी, महंत स्वामी जनार्दन महाराज मच्छिंद्रगड, महामंडलेश्वर १००८ त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी महाराज, इंदूवासिनी संस्थान, महंत राधाताई सानप महाराज, आईसाहेब संस्थान, महासांगवी आदी साधू, संत उपस्थित राहणार आहेत.

सप्ताहात मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर पासून सुरू होणाऱ्या सप्ताहात पहिल्या दिवशी समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदुरीकर यांचे कीर्तन, बुधवार दिनांक १९ नोव्हेंबर रोजी हभप आदिनाथ महाराज शास्त्री तारकेश्वरगड, गुरुवार दिनांक २० नोव्हेंबर नोव्हेंबर रोजी गोरक्षक रामायणाचार्य ह.भ.प. गुरुवर्य संजय महाराज पाचपोर, शुक्रवार दिनांक २१ नोव्हेंबर रोजी गुरुवर्य ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, पंढरपूर, शनिवार दिनांक २२ नोव्हेंबर रोजी हभप अच्युत महाराज दस्तापुरकर, रविवार दिनांक २३ नोव्हेंबर रोजी धर्मगुरू अमृता आश्रम स्वामी महाराज, बीड यांचे कीर्तन, सोमवार दिनांक २४ नोव्हेंबर रोजी ह.भ.प. साधी सोनाली दीदी, अध्यक्ष श्रीक्षेत्र कल्याण स्वामी संस्थान, चकलांबा यांचे कीर्तन होणार आहे. मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबर रोजी कीर्तनकेसरी ह.भ.प. अक्रूर महाराज साखरे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे.या सप्ताहातील प्रत्येक कीर्तनास महाराष्ट्रातील ख्यातनाम, सुप्रसिद्ध गायक, वादक उपस्थित राहणार आहेत. परिसरातील महंत, गायक, वादक यांचीही या कार्यक्रमास उपस्थिती राहणार आहे.

# पुरात खरडलेल्या जमिनीसाठी माती, मुरुम मोफत मिळणार

## जमिनीच्या सुपीकतेसाठी महसूलमंत्र्यांचा निर्णय

मुंबई : प्रतिनिधी

राज्य सरकारने पूरग्रस्त शेतक-यांसाठी आज महत्त्वाचा निर्णय घेतला. यात अतिवृष्टीमुळे बाधित शेतक-यांच्या खरडलेल्या शेतजमिनीसाठी मोफत माती, गाळ, मुरूम आणि कंकर दिला जाणार असल्याची माहिती पुढे आली आहे. जमिनीच्या सुपीकतेसाठी महसूल मंत्र्यांनी हा मोठा निर्णय घेतला. पूरग्रस्त जमिनीसाठी गौण खनिजे इत्यादींवर रॉयल्टी माफ करण्यात येणार आहे. दरम्यान, राज्य सरकारच्या या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेश राज्यातील सर्व जिल्हाधिका-यांना देण्यात आले. त्यामुळे अतिवृष्टीबाधित पूरग्रस्त शेतक-यांना या निर्णयामुळे दिलासा मिळाल्याचे चित्र आहे.

शेतक-यांना आपण जगाचा पोशिंदा, अन्नदाता म्हणतो. पण सध्या राज्यातील शेतकरी संकटात सापडला. अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतक-यांच्या घराचे, पिकांचे आणि त्याचबरोबर जमिनींचे मोठे नुकसान झाले आहे. सोलापूर जिल्ह्यातील सीना नदीला सप्टेंबर महिन्यात महापूर आला होता. या पुरात शेतक-यांची पिके तर वाहून गेलीच, पण जमिनी वाहून गेल्या आहेत. जमिनीला १० ते १५ फुटाचे खड्डे पडले आहेत. नदीने पाण्याचा प्रवाहच बदलल्याने सगळे होत्याचे नव्हते झाले आहे. अशीच काहीशी परिस्थिती उर्वरित महाराष्ट्रातील बहुतांश ठिकाणी बघायला मिळाली आहे. दरम्यान, या संकटात सापडलेल्या शेतक-यांना मायेचा आधार देण्यासाठी आता राज्य सरकारने हा महत्वाचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्रात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तब्बल ३० जिल्ह्यांमध्ये शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात आले आहेत. गेल्या २ महिन्यांमध्ये राज्यात पावसाचे थैमान चालू असून, पूर आणि अतिवृष्टीमुळे शेतक-यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात राज्यातील १,७८५,७१४ हेक्टर (४,२८४,८४६



एकर) क्षेत्र अतिवृष्टीमुळे बाधित झाले आहे. या काळात प्रामुख्याने खरीप पिकांचे नुकसान झाले असून, सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग यासोबतच भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद यांनाही मोठा फटका बसला आहे.



### या जिल्ह्यांत झाले मोठे नुकसान

सर्वाधिक नुकसान झालेले जिल्हे नांदेड (७२८,०४९ हेक्टर), यवतमाळ (३१८,८६० हेक्टर), वाशिम (२०३,०९८ हेक्टर), धाराशिव (१५७,६१० हेक्टर), अकोला (१७७,४६६ हेक्टर), सोलापूर (४७,२६६ हेक्टर) आणि बुलढाणा (८९,७८२ हेक्टर) आहेत.राज्यातील एकूण १९५ तालुक्यांमध्ये या अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असून ६५४ महसूल मंडळांतील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

# नगर-मनमाड महामार्गावर अग्नितांडव!

## लक्झरी बस-कारची भीषण धडक; कारचालक जळून ठार

अहिल्यानगर / प्रशांत बाफना

आपल्या बहिणीला आणण्यासाठी कार घेऊन नाशिक जिल्ह्यातील विंचूर येथून कोपरगाव तालुक्यातील पुणतांबा फाटा येथे निघालेल्या तरुणाचा कार आणि खाजगी बसच्या अपघातात मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. अहिल्यानगरमधील कोपरगाव तालुक्यातील नगर-मनमाड महामार्गावर भास्कर वस्ती जवळ १४ नोव्हेंबर रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास भीषण अपघात घडला.

महामार्गावरून जात असताना कार आणि खाजगी बसची जोरदार धडक झाली. कारने अचानक पेट घेतला आणि काही क्षणातच कार आगीच्या भक्ष्यस्थानी सापडली. या भयंकर आगीत कार चालक जळून जागीच मृत्युमुखी पडल्याची दुर्दैवी घटना घडली. मुजाहिद पप्पू शेख, वय अंदाजे ३० वर्ष, राहणार विंचूर, तालुका निफाड, जिल्हा नाशिक, असे अपघातात होरपळून मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, खाजगी बस शिर्डीवरून इंदोरच्या दिशेने जात असताना कोपरगाव तालुक्यातील टाकळी फाटाजवळ पोहोचली. समोरून येवल्याहून कोपरगावच्या दिशेने जाणाऱ्या क्रेटा वाहनाची समोरासमोर जोरदार धडक झाली. धडकेनंतर बसचा पुढील भाग चक्काचूर झाला तर क्रेटाने पेट घेऊन जळून खाक झाली.

बसमधील अनेक प्रवासी किरकोळ जखमी झाले. अपघात होताच प्रसंगावधान राखून बसमधील प्रवाशांनी तातडीने बसमधून उतरून आपला जीव वाचवला. घटनास्थळी कोपरगाव नगरपालिकेचे अग्निशमन दल तसेच सहकार महर्षी शंकरराव कोल्हे साखर कारखान्याचे अग्निशामक दल तातडीने दाखल झाले आणि दोन्ही पथकांनी संयुक्तपणे कारवरील आग विझवण्यात यश मिळवले. बसमधील प्रवाशांना स्थानिकांनी मदत केली मात्र क्रेटाने पेट घेतला असता गाडी सीएनजी आहे की काय? अशी चर्चा झाल्यानंतर गाडीजवळ कोणी गेलंच नाही.

अपघातामुळे नगर-मनमाड महामार्गावर वाहतूक पूर्णपणे ठप्प होऊन वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. कोपरगाव शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत करण्याचे काम युद्धपातळीवर केले आहे. जवळपास अर्धा तास कार जळत असल्याने कारमधील तरुण पूर्णपणे राख झाल्याची माहिती आहे. पुढील तपास कोपरगाव पोलीस करत आहेत. मयत तरुण मुजाहिद याची विंचूर येथे चिकनचे दुकान असून मनमिळाऊ स्वभावाचा असल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. बसमधील प्रवाशांना किरकोळ स्वरूपाची इजा झाली असून काहींवर कोपरगावच्या रुग्णालयात उपचार सुरू आहे

# राष्ट्रवादीच्या शितलताई दाभाडे यांच्या विजयासाठी नारीशक्ती एकवटली

गेवराई (प्रतिनिधी)

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शितलताई दाभाडे यांच्यासह राष्ट्रवादीचे सर्व उमेदवार निवडून आणण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसची नारीशक्ती एकवटली असून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांनी गेवराई नगरपरिषद निवडणूक प्रचाराचे तगडे नियोजन केले आहे. शितलताई दाभाडे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी महिला आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रभाग क्रमांक ९ मध्ये मतदारांच्या गाठीभेटी घेऊन राष्ट्रवादीच्या घड्याळाचा गजर करण्याचे आवाहन केले आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शितलताई दाभाडे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी महिला आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रभाग क्रमांक ९ मध्ये मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. बोर्डे गल्ली, पवार गल्ली, धनगर गल्ली, रंगार चौक, दाभाडे गल्ली, राम मंदिर परिसर, मोंढा रोड परिसर या भागामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला कार्यकर्त्यांनी प्रचार फेरी काढली. यावेळी गेवराई नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शितलताई महेश दाभाडे म्हणाल्या की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली शहराचा विकास करण्यासाठी घड्याळाच्या चिन्हावर बटन दाबून मला आशिर्वाद देण्याचे आवाहन केले.

यावेळी शितलताई दाभाडे यांनी प्रत्येक घरोघरी जाऊन मतदारांच्या भेटी घेतल्या. यावेळी मतदार बंधू भगिनींचा मोठा प्रतिसाद मिळाला. या प्रचार फेरीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शहर अध्यक्ष पल्लवी गोगुले, किरण दाभाडे, शहर उपाध्यक्ष शीला पैठणे, सचिव अनिता काळे, सरचिटणीस नीता बेद्रे, संगीता घोडके, प्रीती दाभाडे, सीमा होंडे, अनिता खेत्रे, दिपाली मडके, जयश्री दाभाडे, गौरी दाभाडे, मोनिका पंडित, अश्विनी पंडित भावना जैन, किरण दाभाडे, वैष्णवी दाभाडे, आरती गायकवाड योगिता तांबारे, गीता बेद्रे, अनिता काळे, गीता दाभाडे, शोभा औटी, रोहिणी मुळे, शेख रियान, शेख परवीन, नीता डरपे, सुमती पुरणपोळे, वैष्णवी दाभाडे, सोनाली हजारे, अर्चना हजारे, अमृता गायकवाड अलका गायकवाड, सोनाली दाभाडे, सीमा जंवजाळ, त्रिवेणी मुळे यांच्यासह या प्रभागाच्या महिला उमेदवार मंगल आत्माराम हाजारे व उमेदवार श्रीकृष्ण सुमंतराव मुळे सहभागी झाले होते. या प्रचार फेरीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते माऊली पंडित, अभिषेक गायकवाड, ज्ञानेश्वर दाभाडे, सोनू दाभाडे, आदित्य दाभाडे रघुनाथ आतकरे, दिनेश मोटे, विशाल ठाकूर, मनोज हजारे, संदीप मुळे, सचिन मुळे, अमोल मुळे, रोहित मुळे, राजू आंबेभुईकर, गोरख शिंदे, संतोष हेटनाळकर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने सोलापूर मधून केली अल्पवयीन पीडितेची सुटका व आरोपीला घेतले ताब्यात



पोस्टे दिंद्रुड गुन्हा रजिस्टर नंबर ०२/२०२४ कलम ३६३, ३७० भादवी हा गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे तपासावर होता. फिर्यादी तसेच आरोपीचे नातेवाईक यांच्या चौकशी दरम्यान त्यांच्याकडून उपयुक्त माहिती मिळाली. सदर माहितीच्या आधारे तांत्रीक पद्धतीने कौशल्यपूर्ण तपास करुन पीडित मुलगी व आरोपी यांचे वास्तव्य सोलापुर जिल्ह्यात असल्याचे समजले. त्यावरून दिनांक १३/११/२०२५ रोजी दुपारी -क्ढण ची टीम ही मा. एसपी सर यांच्या आदेशाने सोलापूरकडे रवाना झाली. सोलापूर येथे पोहोचल्यावर रात्रीच्या अंधारात टीम पीडित व आरोपीचा शोध घेत होती, शेवटी सकाळी तीन वाजता पीडित मुलगी व आरोपी हे दोघे केडगाव ता. करमाळा जि. सोलापूर येथे मिळून आले. त्यांना ताब्यात घेऊन पोस्टे करमाळा येथे हजर केले व टीम बीड कडे रवाना झाली. त्यानंतर -क्ढण ची टीम पोस्टे दिंद्रूड येथे आली व सदर पीडीत मुलगी व आरोपीला पुढील तपासकामी पोस्टे ला हजर केले.

सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत सर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली झडख पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, प्रदीप येवले, अशोक शिंदे, सर्व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड यांनी केली.

# जिंतूर नगर परिषद पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांचे चक्रयुव्ह भेदून मा आ विजय भांबळे देणार का मात?

## नगर परिषदेत मुस्लिम मतदार किंगमेकर?





जिंतूर:-- नगर परिषदेच्या निवडणुकीच्या रणसंग्राम चालू झाल्यानंतर राज्यात महायुतीचे घटक पक्ष असलेले भारतीय जनता पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस)अ प गट) यांच्यात नगर परिषद निवडणुकीची खरी लढत होणार आहे नगर परिषदेच्या सर्वच्या सर्व १२ प्रभागातून २५ उमेदवार दोन्ही पक्षांकडून मैदानात उतरणार आहे व दोन्ही पक्षाने नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे भारतीय जनता पक्षाने नगराध्यक्ष पदाचे उमेदवार प्रताप देशमुख यांनी मैदानात उतरवले आहे तर राष्ट्रवादी काँग्रेस अ प गटाने माजी नगराध्यक्षा सबिहा बेगम कफील फारूकी यांना मैदानात उतरवले आहे या प्रतिस्पर्धी दोन्ही उमेदवारांनी प्रचाराचा नारळ फोडुन प्रचाराला सुरुवात केली आहे तर विरोधी पक्ष असलेल्या महाविकास आघाडी चे घटक पक्ष असलेले काँग्रेस पक्षानेही नगराध्यक्ष पदाचा उमेदवार निवडणूकीच्या मैदानात उतरवले आहे त्यांनी माजी नगरसेवक इस्माईल पहेलवान यांना उमेदवारी देण्यात आली आहे महायुतीचे दोन्ही घटक पक्ष स्वबळावर लढणार आहे भाजपाचे नगरसेवक सेवक पदाचे उमेदवार अजून ही निश्चित झाले नाही तर ही अवस्था राष्ट्रवादी काँग्रेस अ प गटांची आहे तर विरोधी पक्षाच्या भूमिकेत दिसणार महाविकास आघाडीचे काँग्रेस पक्षाने ही नगराध्यक्ष पदाचा उमेदवार जाहीर केले पण नगर सेवकांच्या नावांची अजून घोषणा केली नाही मात्र जिंतूर नगर परिषद निवडणुकीत खरी लढत भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस अ प गट यांच्यात होणार आहे याही वेळेस नगराध्यक्ष पदाचा उमेदवार हा जनतेतूनच निवडला जाणार आहे ही निवडणूक नगराध्यक्ष पदासाठी होणार असली तरी मतदान मात्र पालकमंत्री मेघना बोर्डीकर व मा आ विजय भांबळे तसेच उमेदवाराला पाहुण मतदार मतदान करणार आहे असे दिसते विधानसभा निवडणुकीत एकमेकां समोर उभे असलेले पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी मा आ विजय भांबळे यांना निवडणुकीत मात दिली होती आता पुन्हा एकदा हे दोन्ही प्रतिस्पर्धी नगर परिषद निवडणुकींच्या निमित्ताने एक दुसऱ्यांच्या समोरा समोर दिसत आहे पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी या निवडणुकीत राजकीय रणनितीचे चक्रव्यूह आखले आहे मा आ विजय भांबळे या चक्रव्यूह कसं भेदतील हे येणारा काळच सांगेल

दोन मुस्लिम उमेदवारातील एक उमेदवार असेल. *मॅनेज ?तो उमेदवार कोण शहरात जोरदार चर्चा?

### दोन सांडांच्या टक्करीत होईल कुपाटीचा चुराडा

जिंतूर नगर परिषद निवडणुकीत मुस्लिम मतदार हे किंगमेकर आहे अंदाजे ५०% टक्के मुस्लिम मतांवर डोळा ठेवून जो पक्ष मुस्लिम उमेदवार देईल तो दुसरा उमेदवार मतविभागणी करण्यासाठी उभा केलेला मॅनेज उमेदवार असेल हे न समजण्या इतपत आता मुस्लिम समाज इतका दुध खिळा नाही मुस्लिम समाज ज्यांच्या पारड्यात पडले त्यांचा मात्र नक्कीच नगराध्यक्ष विजयी होईल हे मात्र तेवढीच खरे ही काळ्या दगडावरची पांढरी रेष असेल

# ठाकरेंना मोठा धक्का ! काँग्रेसची 'एकला चलो'ची घोषणा

## मुंबई महानगरपालिका स्वबळावर लढणार




मुंबई: काँग्रेसने मित्रपक्ष उद्धवसेनेशी फारकत घेत मुंबई महापालिका निवडणुकीत स्वबळावर लढण्याचा निर्णय शनिवारी जाहीर केला. लोकसभा आणि विधानसभा दोन्ही निवडणुका आघाडी म्हणून एकत्र लढलो. पण, त्यामधून काँग्रेसला काय मिळाले? आघाडीत असताना काय सहन केले ते आम्हाला माहित आहे. त्यामुळे मुंबईत काँग्रेस स्वतंत्र लढेल, अशी घोषणा अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी शनिवारी केली.

मुंबई काँग्रेसने 'लक्ष्य २०२६' अंतर्गत मालाड येथे आयोजित शिबिरात चेन्नीथला म्हणाले की, मुंबईतील २२७ जागांवर काँग्रेस उमेदवार पंजा चिन्हावर लढणार आणि काँग्रेस विजयी होईल. त्यासाठी आमचे नेते राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांनी परवानगी दिली आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीसाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे व उद्धव ठाकरे एकत्र येणार असे चित्र दिसत आहे. तर, मनसेला महाविकास आघाडीत सहभागी करून घेण्यास काँग्रेसने विरोध केल्याने पालिका निवडणुकीत मनसे व महाविकास आघाडी एकत्र निवडणूक लढणार का, याकडे सर्वांचे लक्ष होते.

चेन्नीथला म्हणाले, मुंबई महापालिकेची निवडणूक काँग्रेस स्वतंत्र लढणार आहे. २२७ जागांवर काँग्रेस उमेदवार पंजा चिन्हावर लढणार आणि काँग्रेस विजयी होणार. ही निवडणूक एक आव्हान असले तरी त्याचा सामना करण्यासाठी सर्वांनी एकत्र मिळून काम करावे लागेल, असेही ते म्हणाले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# नव्या धाटणीचे बौद्ध गीत सृष्टी अनित्य है.. यही तो एक सत्य है..

गोंदिया ।प्रतिनिधी

कवी मनाच्या आंबेडकरी नेत्यांनी बुद्धाच्या देसनेवर आधारित ये सृष्टी अनित्य है.. यही तो एक सत्य हैं.. हे गाणं लिहून बौद्ध धम्मावरचे आपली प्रगाड श्रद्धा आणि बुद्धाच्या देसनेचे साध्या भाषेत गेय रूपात लिहून आपली धार्मिक ऋण फेडण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे.

यापूर्वीही अनेक गाणी लिहिली गायली गेली आणि ती लोकप्रिय ठरली. त्या त्या काळात त्या त्या गाण्यांचा परिणाम सामान्य बौद्ध धर्म पालन करणाऱ्या आंबेडकरी मनावर राहिला आहे. काही गाणी सिनेमांच्या गाण्यांच्या चालींवर लिहिली गेली ती तितकी जी लोकप्रियता मिळू शकली नाही हेही तेवढेच सत्य आहे.

आताच्या काळात बौद्ध धम्मावर गाणी आधी सारखे तयार होत होती त्याप्रमाणे होत नाहीत असे दिसते मात्र काही गायक आणि कलाकार याला अपवाद आहेत. अशा गायक कलाकारांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य हे आंबेडकरी बौद्ध गीतांसाठी वाहिलेले आहे. वर्तमानात याला आणखी एक वेगळे वलय प्राप्त करून देणारा गायक म्हणजे पावा हा आहे. या गायकाचे नाव मोठ्या सन्मानाने घेतले जाते.

पावा हा गायक बौद्ध धम्मातील गाथांचे गेय रूपात गायन तितकेच लयबद्ध आणि कर्णप्रिय आवाजात करतो की ते वारंवार ऐकावे असेच वाटते. विदर्भातील आंबेडकरी नेते म्हणून ख्यात असलेले आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारे राजकुमार बडोले यांनी ये सृष्टी अनित्य है...यही तो एक सत्य है.., हे गाणे लिहिले. तसेच हे गाणे पावा या गायकाने त्याच्या सुमधुर आवाजात गायले आणि या गाण्यातील व्हिडिओमध्ये गगन मलीक या अभिनेत्याने तथागत बुद्धांची भूमिका निभावली. सर्वार्थाने हे गाणे परिपूर्ण असे आहे. ते गाणे ऐकल्यावर बघितल्यावर अधिक प्रखरतेने जाणवते. या गीताच्या अल्बम ला ' डिवाइन सरेंडर' असे नाव देण्यात आले आहे. डिवाइन सरेंडर म्हणजे अध्यात्मिक (दैवी) समर्पण असे म्हणू शकतो या अल्बमचे लॉन्चिंग मुंबईत नुकतेच एका भारावलेल्या वातावरणात पार पडले.



या बौद्ध संगीतमय कार्यक्रमात बौद्ध भंते राहुल बोधी रॉयल थाई कॉन्स्युलेट, मुंबईचे कॉन्सुल-जनरल डॉनाविट पूल्सवात आणि महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून श्रीलंकेच्या कॉन्सुल-जनरल शिरवाणी अरियारत्ने, महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे, सिद्धिविनायक सिने आर्ट्स (प्रा.) लिमिटेडच्या चेअरपर्सन कौशल्या विक्रमसिंघे, यासह थायलंडचे उद्योजक आणि संशोधक क्ट. कॅप्टन नट्टाकिट चायचलेर्ममोंग्खोन आणि युगंधर क्रिएशन्सचे निर्माता अनिकेत बडोले उपस्थित होते. तसेच या गीताचे संगीतकार व गायक पावा, अभिनेते गगन मलिक आणि 'डिव्हाइन सरेंडर' म्युझिक व्हिडिओच्या दिग्दर्शनामुळे या गाण्याला वेगळी कलात्मकता प्राप्त झालेली आहे. याचे दिग्दर्शन नीरज प्रभाकर यांनी केलेले आहे.

हे गीत थाई, व्हिएतनामी, श्रीलंकन, कंबोडियन, बांगलादेशी भाषांमध्ये ही भाषांतरित होऊन प्रदर्शित होणार आहे. त्यामुळे हे गाणे केवळ भारतीय न राहता आंतरराष्ट्रीय दर्जाचे होणार आहे. बुद्धांच्या शांतीचा संदेश जगभर नव्याने भारतातून पुन्हा पोहोचणार आहे. आशियातील प्रतिष्ठित स्टुडिओ पैकी बँकॉक मधील स्टुडिओ २८ मध्ये या गीताचे रेकॉर्डिंग करण्यात आले भव्य सिम्पनी आर्केस्ट्राच्या सुरुवातीला जागतिक आर्केस्ट्राची सांगड घालण्यात आलेली आहे.

या गीताच्या लॉन्चिंग कार्यक्रमाच्या वेळी माजी मंत्री तथा विद्यमान आमदार राजकुमार बडोले यांनी आपल्या भावना व्यक्त करीत सांगितले ' डिवाइन सरेंडर' केवळ गीत नसून एक्यासाठीची प्रार्थना आहे. आपल्या अंतर्मनातील दैवी सत्यासमोर केलेले समर्पण आहे. या गीतातील शब्दांच्या माध्यमातून भौगोलिक सीमा ओलांडून शांततेचा संदेश देण्याची कल्पना केली आहे. पावा यांचे हृदय स्पर्श करणारे गायन आणि संगीत थायलंडमध्ये रेकॉर्ड करण्यात आले आहे. गगन मलिक यांच्या परिणामकारक अभिनयाच्या उपस्थितीमुळे ते जिवंत झाले आहे हे गीत म्हणजे भारत व जगातील करुणेचा सेतू साधणार आहे.



# भाजपाचे मा.नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांचा पुढाकार

लोह्यात दिवसेंदिवस भाजपा बळकट

लोहा / प्रतिनिधी

लोहा न.प.निवडणुकीच्या तोंडावर भारतीय जनता पार्टी मध्ये इन्कमिंग मोठ्या प्रमाणात सुरू झाली असून यात शिवा संघटनेचे लोहा तालुकाध्यक्ष हनमंत लांडगे व काँग्रेसचे लोहा तालुका कोषाध्यक्ष शिवाजी आंबेकर, केशव पाटील पवार, निखिल महाबळे, किरण. डोईफोडे,यांनी भाजपाचे जेष्ठ नेते तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत नांदेड येथे भारतीय जनता पार्टी मध्ये जाहिर प्रवेश केला आहे.

यामुळे लोह्यात भाजपा पक्ष दिवसेंदिवस अधिक बळकट होत आहे. यापुर्वी शिवसेना शिंदे गटाचे लोहा -कंधार विधानसभा प्रमुख मिलिंद पाटील पवार यांनी भाजपा प्रवेश केला आहे.

भाजपाचे लोहा शहर मंडळ अध्यक्ष तथा मा.नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत मा. नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांच्या पुढाकाराने भारतीय जनता पार्टी मध्ये इन्कमिंग मोठ्या प्रमाणात होत आहे. दि.१५ नोव्हेंबर रोजी शिवा संघटनेचे लोहा तालुकाध्यक्ष हनमंत लांडगे व काँग्रेसचे लोहा तालुका कोषाध्यक्ष शिवाजी आंबेकर,केशव पाटील पवार, निखिल महाबळे,किरण डोईफोडे,यांनी भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

यावेळी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी हनमंत लांडगे व शिवाजी आंबेकर यांचा भाजपमध्ये प्रवेश केल्यामुळे त्यांचा माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी स्वागत करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी भाजपाचे माजी प्रदेश प्रवक्ते एकनाथ दादा पवार भाजपा लोहा मंडळ अध्यक्ष तथा मा. नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी,मा.जेष्ठ नगरसेवक बबनराव निर्मले,, माजी नगरसेवक युवराज वाघमारे, माजी नगरसेवक संदीप दमकोंडवार, माजी नगरसेवक नबी शेख, माजी नगरसेवक अमोल व्यवहारे,मिलिंद पाटील पवार,केशव पाटील पवार, बाळासाहेब कतुरे, आशिष व्यवहारे, लक्की फुलवरे , वैभव हाके ,किरण डोईफोडे,आदी उपस्थित होते.



# गुरुनानक प्राथमिक विद्यालयात बालदिन उत्साहात साजरा

बीड ।प्रतिनिधी

श्री विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी, ता. केज जि.बीड संचालित,गुरुनानक प्राथमिक विद्यालय,शाहूनगर,बीड येथे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पवार एस. ए. या होत्या तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री गदळे आर. ए.आणि ठोकरे एम.व्हि.हे लाभले.कार्यक्रमाच्या सुरवातीस मान्यवरांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन झाल्यास. विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली यात संग्राम जाधव ,अनुश्री गदळे, जाधव अमृता, जिशान बागवान, आरोही शेळके, आदिरा पव्हणे यांनी चाचा नेहरू यांच्या जीवनावर आधारित मनोगते व्यक्त केली. श्री गदळे सर आणि ठोकरे सर यांनी पंडित नेहरू यांच्या जीवनातील काही महत्वाचे प्रसंग विद्यार्थ्यांना सांगून चाचा नेहरू खरोखरच मुलांचे आवडते का होते,त्यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान याचे बारकाव्याने वर्णन केले. बालदिन साजरा करण्यासाठी विद्यार्थी आज छान रंगबेरंगी कपडे परिधानकरून आले होते,सर्व विद्यार्थ्यांना श्रीमती डोंगरे मॅडम यांनी पेन,पेन्सिल,पुस्तके भेट दिली तर बालदिनानिमित्त त्यांना शाळेतर्फे खाऊ वाटप केल्यामुळे विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला.

या कार्यक्रमाचे अतिशय उत्तम सूत्रसंचलन गदळे अनुष याने केले तर प्रास्ताविक कु. अनुष्का गिरे हिने केले विद्यार्थ्यांचा आवडता बालदिन छानच रंगला शेवटी आभार हाके श्रद्धा हिने मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्रीमती. हंगे मॅडम, श्रीमती. पव्हणे मॅडम, मुंडे मॅडम श्री ठोकरे सर आणि श्री तांदळे सर यांनी सहकार्य केले.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान यशस्वी करुन सरपंचांनी ग्राम समृद्धी करावी - ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे

## सरपंचाचा प्रतिनिधी विधान परिषदेत असावा - आ.सुरेश धस

आष्टी (प्रतिनिधी)

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची मुदत ४५ दिवसांनी वाढवली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ही महत्त्वाकांक्षी योजना असून ग्रामविकासासाठी अत्यंत उपयुक्त असणारी ही योजना यशस्वी करण्यासाठी सरपंचांनी मोठी भूमिका बजावावी.

केवळ शासकीय अधिकाऱ्यांवर अवलंबून न राहता सरपंचांनी ग्रामस्थांना बरोबर घेऊन ही योजना राबवल्यास महाराष्ट्रातील सर्व गावे ग्राम समृद्ध होतील असे प्रतिपादन राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी केले तर सरपंच संघटना ही सदैव संघर्ष शील आणि ग्रामीण भागाच्या समस्या निवडण्यासाठी तत्पर असल्यामुळे ही अत्यंत कठीण बाब असूनही सरपंच परिषद दत्ता काकडे यांचे नेतृत्वाखाली समर्थपणे काम करत आहे. त्यांनी शिवतीर्थ या निवासस्थानात गृहप्रवेश छत्रपती शिवाजी महाराज पुतळा अनावरण आणि मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान संवाद मिळावा आयोजित करून त्रिवेणी संगम साधला आहे असे प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले तर सरपंच हा ग्रामीण विकासाचा कणा असून शिक्षक पदवीधर स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा सदस्यातून देखील विधान परिषद सदस्य निवडले जातात त्याचप्रमाणे राज्यातील सर्व सरपंचांमधून एक आमदार निवडला जावा अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी केली.

आष्टी येथील सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष पत्रकार दत्ताभाऊ काकडे यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानामध्ये गृहप्रवेश तसेच हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अनावरण सोहळा आणि मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी ते बोलत होते.



यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि समन्वयक दैनिक लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर, सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राचे सर्व पदाधिकारी, माजी आमदार भीमराव धोंडे, जयदत्त भैय्या धस, यशदाचे उपमहासंचालक डॉक्टर मल्लिनाथ कलशेट्टी, डॉ. शिवाजी राऊत हे उपस्थित होते. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे पुढे बोलताना म्हणाले की, महाराष्ट्र सरकारने ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरू केले आहे. गावातील अंतिम घटकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचवणे लोकसहभाग वाढवणे आणि ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद यांच्या कार्यक्षमतेत सुधारणा करणे हे मुख्य उद्दिष्ट असून आर्थिक वर्ष २०२५ - २६ साठी या उपक्रमाची रूपरेषा तयार करण्यात आली आहे. या अभियानामध्ये सात प्रमुख घटक निश्चित करण्यात आले असून सुशासनयुक्त पंचायत, सक्षम पंचायत आणि जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गावे, मनरेगा आणि इतर योजनांचे अभिसरण, गाव पातळीवरील संस्था, सक्षमीकरण उपजीविका विकास आणि सामाजिक न्याय, लोकसहभाग आणि श्रमदान माध्यमातून लोक चळवळ निर्माण व्हावी या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

दत्ताभाऊ काकडे यांच्या नेतृत्वाखालील सरपंच परिषदेच्या सर्व मागण्या या सकारात्मक असतात. त्यामुळे ग्रामविकासासाठी अखंड परिश्रम घेणाऱ्या या संघटनेचे महाराष्ट्रातील ग्राम विकासामध्ये मोठे योगदान ठरणार आहे. सरपंचांनी देखील हेच पंचायतराज अभियान यशस्वी करावे असे आवाहन त्यांनी शेवटी केले.

# अंबाजोगाई शहरातील बहुसंख्य नवतरुणाईचा कल राजकिशोर मोदी यांच्याच बाजूने

## दररोज विविध प्रभागातील अनेक नवतरुणांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक जसजशी जवळ येऊ लागली आहे तसा अंबाजोगाई शहरातील नवतारुणांचा ओढा राजकिशोर मोदी यांच्याकडे येऊ लागला आहे. शहरातील विविध प्रभागातील अनेक नवतारुणांचा राष्ट्रवादी काँग्रेस तथा राजकिशोर मोदी यांच्याकडे जाहीर प्रवेश होऊ लागला आहे. या नवतारुण युवा मतदारांच्या मुळे युवा नेते संकेत मोदी तसेच राजकिशोर मोदी यांचा आत्मविश्वास द्विगुणीत होतांना दिसून येत आहे. सर्व नवतरुणाईने एकवटून अंबाजोगाई नगर परिषदेचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर मोदी तसेच त्याच्या सर्व नगरसेवकाना मोठ्या मताधिक्याने विजयी करून आणण्यासाठीचा विडा त्यांनी उचलला आहे.

अंबाजोगाई शहरात युवा नेतृत्व संकेत राजकिशोर मोदी यांच्या खांद्याला खांदा लावून त्याची साथ देण्यासाठी अंबाजोगाई शहरातील प्रभाग क्रमांक १, प्रभाग क्रम २ , प्रभाग क्रमांक ३ , ४, ९,१०, ११ ,१२, १४,१५ या प्रभागातील पटाईत गल्ली, बागवान गल्ली , झारे गल्ली, चौभारा परिसर, मंगळवार पेठ, बलुत्याचा मळा, गौड गल्ली, धनगर गल्ली, साबून गल्ली, मणियार गल्ली, सदर बाजार,भोई गल्ली, गवळी पुरा, गांधी नगर, बिलाल नगर, क्रांती नगर या व अशा अनेक भागातील असंख्य नवतरुण बिनशर्त संकेत मोदी तसेच राजकिशोर मोदी यांच्याकडे वळल्या जात आहे. या नवतारुणांचा जोश व उत्साह पाहून मोदी कुटुंब हत्तीचे बळ लाभल्याची अनुनभूती घेत आहे. त्यांच्यात शहराच्या विकासाची जनभावना पुन्हा जोमाने उफाळून येऊ लागली आहे.

राजकिशोर मोदी यांनी मागील तीस पस्तीस वर्षांपासून अंबाजोगाई शहरासाठी केलेल्या सामाजिक , राजकीय , आर्थिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यावर प्रेरित होऊन आजचा तरुण वर्ग त्यांच्या संपूर्ण पणे पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा संकल्प करत आहेत. त्यांनी शहरात विविध शैक्षणिक संस्थाच्या माध्यमातून अंबाजोगाई शहर व परिसरातील अनेक विद्यार्थी उच्च शिक्षित केले आहेत. त्याचबरोबर बँक , पतसंस्था, मल्टिस्टेट यांच्या माध्यमातून देखील शेकडो तरुण बेरोजगारांना आर्थिक साहाय्य करून त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना उभा केले आहे. बाल-झुंबडच्या माध्यमातून शहर व परिसरातील शालेय विद्यार्थ्यांना एक हक्काचे सांस्कृतिक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळेच राजकिशोर मोदी हे नाव अंबाजोगाई शहरातील लहानापासून ते वयोवृद्ध नागरिकांच्या मना मनामध्ये घर करून आहे. याचा थेट फायदा हा संकेत मोदी व राजकिशोर मोदी यांना व त्यांच्या संपूर्ण सहकार्यांना या नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत हमखास पणे होईल अशी खात्री मोदी परिवारास दिसून येत आहे.



## भारतीय स्टेट बँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था

# बीड येथे बीसी सखी प्रशिक्षण कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न

वडवणी ।प्रतिनिधी

बीसी सखी प्रशिक्षण घेत असताना मोठ्या संख्येने ग्रामीण भागातील महिला उपस्थित राहिल्या होत्या.बीसी सखी प्रशिक्षण हे सहा दिवसाचे होते. इथे महिलांची राहण्याची जेवणाची उत्तम सुविधा उपलब्ध करून दिली गेली. डइख आरसेटी बीड ठिकाणी स्वयंरोजगाराची विविध संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.इथे बी सी प्रशिक्षण सहित आरी वर्क,ब्युटी पार्लर,फोटोग्राफी असे बरेच प्रशिक्षण घेतले जात आहे.महिलांनी पण मोठ्या प्रमाणात या प्रशिक्षण सहभाग नोंदवला आहे.आय.आय.बी. एफ. परीक्षा देऊन ३२ बसी सखी चांगल्या मार्कने परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आहेत. एस. बी. आय. आरसेटी बीड या ठिकाणी स्वयंरोजगारासाठी अनेक मोफत,निवासी .प्रशिक्षणाचे आयोजन करण्यातआले. या दरम्यान ,जेवण, प्रशिक्षण साहित्य देखील मोफत देण्यात येते,उमेद अभिनयातील स्वयं सहायता समूहातील महिलांना गावातच समूहाचे बँकिंग व्यवहार करता यावेत.यासाठी एक ग्रामपंचायत एक बिसी एक बीसी सखी नेमणूक केली आहे. भारतीय स्टेट बँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था बीड या ठिकाणी मोफत सहा दिवसाचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.या प्रशिक्षणात अनेक मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले.प्रशिक्षक बँकिंग निवृत्ती अधिकारी बी.डी. शिरसट यांनी महिलांना बँकिंग विषयाचे संपूर्ण नॉलेज दिले, जिल्हा अभियान व्यवस्थापक मुरहरी सावंत यांनी. बीसी सखी यांची कार्यपद्धती, कर्तव्य जबाबदारी, उमेद मध्ये करत असताना कामाचे स्वरूप काय असते त्यांनी विषद केले. सी. एस. सी. चे व्यवस्थापक दिनेश जाधव यांनी सी. एस. सी. च्या सेवांबद्दल माहिती दिली, एल. आय. सी. डेव्हलमेंट ऑफिसर अनुराग जैन यांनी विमा सखी बद्दल माहिती दिली. त्याच बरोबर आपण ग्रामीण भागात काम करून कसे चांगले काम करू शकतो या विषयी आत्मविश्वास वाढविला. हे जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक बिजेंदु झा व संचालक आरसेटी ,पंकज मेहरा यांच्या नियंत्रनाखाली राबविण्यात आले. सुरेश बोचकुरे ,सय्यद चांद,आसिफ शेख ,संतोष काळेगावकर, शहानवाज पठाण,ऋषिकेश लांडगे, प्रशिक्षण यशस्वी होण्यासाठी या सर्व सरांचे मोठे योगदान आहे.या प्रशिक्षणात परळी, गेवराई, आष्टी, माजलगाव, केज, धारूर, बीड तालुक्यातील ३२ महिलांनी सहभाग नोंदवला. प्रशिक्षण यशस्वी झाल्यानंतर आयोजकांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

# प्रा.निसार शेख महाराष्ट्र गौरव आदर्श शिक्षक राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित



## सिने अभिनेत्री चित्रा दिक्षित,अप्पर पोलीस अधीक्षक डॉ.राठोड यांच्या हस्ते झाला सन्मान

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील साबलखेड येथील सर्व सामान्य कुटुंबात जन्मलेल्या प्रा. निसार शेख यांना शनिवारी दैनिक लोकशक्तीच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त लोकशक्ती महाराष्ट्र गौरव आदर्श शिक्षक हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सिने अभिनेत्री चित्रा दिक्षित, नागपूर येथील अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. दत्ताराव राठोड, गावरान मस्ती फेम वैभव कुऱ्हाडे (गंठणकुमार), ज्येष्ठ साहित्यिक ऐश्वर्य पाटेकर, डॉ. कैलास दौंड, झुंजार नेता चे उपसंपादक उत्तमराव बोडखे, संपादक विजय लेंडाळ, सहसंपादक इम्रान शेख, पत्रकार जावेद सय्यद व इतर मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

प्रा. निसार शेख हे शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धानोरा येथे गेली २५ वर्षापासून प्राध्यापक म्हणून न्यायदानाचे पवित्र कार्य करीत आहेत. शिक्षण क्षेत्रा बरोबरच ते पत्रकार म्हणून ही उत्कृष्ठ कार्य करीत आहेत. शैक्षणिक व पत्रकारिता या दोन्ही क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावत असल्याने त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. प्रा. निसार शेख यांनी गेली २५ वर्षात हजारो विद्यार्थी घडविले आहेत. आज त्यांचे अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी विविध क्षेत्रात उच्च पदस्थ अधिकारी पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना शनिवार दिनांक १५ नोव्हेंबर रोजी अहिल्यानगर येथील हॉटेल यशग्रँड येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात लोकशक्ती महाराष्ट्र गौरव आदर्श शिक्षक राज्यस्तरीय पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा. निसार शेख यांचे माजी आमदार भिमरावजी धोंडे, प्रशासन अधिकारी शिवदास विधाते, डी. बी. राऊत, माऊली बोडखे, संदीप नन्नवरे, सागर वाघुले, प्राचार्य भगवान वाघुले, उपप्राचार्य गहिनीनाथ एकशिंगे, पत्रकार अविनाश कदम, अक्षय विधाते, मुख्याध्यापक तथा पत्रकार जावेद शेख, सामाजिक कार्यकर्ते समीर शेख, संतोष नागरगोजे, गनिभाई तांबोळी, निसारभाई कुरेशी यांच्यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# शेतीनिष्ठ शेतकरी शहाजी आप्पा कोकणे यांना राज्यस्तरीय प्रगतशील पुरस्कार प्रदान



आष्टी (प्रतिनिधी)

**दैनिक लोकशक्तीच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त लोकशक्ती महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२५ चा राज्यस्तरीय सोहळा भव्यदिव्य संपन्न झाला. या समारंभात कोकणातील प्रगतशील शेतकरी शहाजी आप्पा कोकणे यांना राज्यस्तरीय प्रगतशील शेतकरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**

हा सन्मानताजनक कार्यक्रम सिने अभिनेत्री चित्रा दिक्षित, गावरान मस्ती फेम वैभव कुऱ्हाडे (गंठणकुमार), ज्येष्ठ साहित्यिक ऐश्वर्य पाटेकर, डॉ. कैलास दौंड, डॉ. दत्ताराव राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक, लोकशक्ती संपादक विजय लेंडाळकर, पत्रकार जावेद सय्यद या सर्वांच्या हस्ते पार पडला. या विशेष मान्यवरांनी शेतकरी शहाजी आप्पा कोकणे यांना त्यांच्या शुभहस्ते पुरस्कार, स्मृतिचिन्ह व मानपत्र देऊन गौरव केला.

या प्रसंगी झुंजार नेताचे उपसंपादक उत्तमराव बोडखे, समाजसेवक तथा शिवरायांचा मुस्लिम मावळा समीर शेख, मा. सरपंच संभाजी कोकणे, दूध संघाचे चेअरमन शिवाजी घोलप, भाऊ शिंदे, दादा आवारे, रवि होले, बबन फसले, सतीश शहाजी कोकणे तसेच चिखलीकर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्वांनी शेतकरी शहाजी आप्पा कोकणे यांच्या कष्टाळू वृत्तीचा व प्रगत शेतीपद्धतींचा गौरव केला. दैनिक लोकशक्तीच्या या पहिल्या वर्धापनदिनी झालेल्या कार्यक्रमाला सर्वानुमते प्रचंड प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले.

# पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणीसाठी नमून-१८ च्या

### अर्जावर कार्यवाही करण्याच्या कालावधीत वाढ

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे १४ नोव्हेंबर, २०२५ पत्रान्वये पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणीसाठी नमून-१८ च्या अर्जावर कार्यवाही करण्यासाठी तारीख वाढवून दिली असून सुधारित कार्यक्रम जाहिर केला आहे.

हस्तलिखीते तयार करणे व प्रारुप मतदार याद्यांची छपाई दिनांक २८ नोव्हेंबर, २०२५, प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी दिनांक ०३ डिसेंबर, २०२५, दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी दिनांक ०३ ते १८ डिसेंबर, २०२५, दावे व हरकती निकाली काढण्याचा दिनांक व पुरवणी यादी तयार करणे व छपाई करणे दिनांक ०५ जानेवारी, २०२६, मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी दिनांक १२ जानेवारी, २०२६ असा केला असल्याचे मतदार नोंदणी अधिकारी ५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ जितेंद्र पापळकर यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

# आजच्या मुला मुलींना चांगले संस्कार आणि योग्य दिशा देणे ही आपली जबाबदारी आहे - बबनराव आंधळे



बीड ।प्रतिनिधी

शहरातील अरुणा असफअली महिला मंडळ बीड संचलित संत तुकाराम प्राथमिक विद्यालय तेलगाव रोड बीड या ठिकाणी पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती व बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक बबनराव आंधळे सर यांनी भूषवले. तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री आरकडे सर हे उपस्थित होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद यांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शाळेतील शिक्षक श्री जाधव सर यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले गर्कळमॅडम, सोनके मॅडम, ढाकणे सर, मुंडे सर, आरकडे सर यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कार्याविषयी मार्गदर्शन केले.शेवटी अध्यक्षीय समारोप प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक बबनराव आंधळे सर यांनी केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जाधव सर यांनी अगदी उत्कृष्टपणे केले यानंतर शेवटी शाळेचे शिक्षक मुंडे सर यांनी सर्वांचे आभार मानले. शेवटी शाळेतील बालकांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.

# नवपरिवर्तन सामाजिक बहुउद्देशीय संस्था,परिवर्तन काम्प्युटर्स आयोजित सी.ए. वसुधा तांबे कौतुक सोहळा संपन्न

## विद्यार्थी आयुष्यभर शिकत असतो - डॉ.संदीप हंबर्डे

आष्टी (प्रतिनिधी)

जे आपले ध्येय आहे ते साध्य केले तरीही थांबू नका. आयुष्यभर शिकत रहा असे प्रतिपादन रामकृष्ण हास्पीटलचे संचालक प्रसिद्ध पेडियाट्रिक डॉ. संदीप रामकृष्ण हंबर्डे यांनी केले.संभाजीनगर येथील परिवर्तन कॉम्प्युटर्सच्या वतीने आयोजित केलेल्या सी. ए. वसुधा तांबे हिच्या कौतुक सोहळ्यात ते मुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी कॉ.भास्कर लहाने, प्रा. सचिन शिंदे, कॉ. मधुकर खिल्लारे, कॉ. वसुधा कल्याणकर, नवनाथ तांबे व बाळू बोधक यांची उपस्थिती होती.



जयभवानीनगर येथील सर्व सामान्य कुटुंबातील वसुधा तांबे हिने मोठ्या जिद्दीने व कठोर मेहनत करून चार्टर्ड अकाउंट (सी. ए.) परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल तर पुजा टेके हिने एनसीसी कॅडरमधून १७ लेबेल्स पास करून दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनी परेड सादर केल्याबद्दल प्रमुख मार्गदर्शकांच्या हस्ते आजीच्या गोष्टी पुस्तक भेट देऊन सत्कार केला. प्रा. सचिन शिंदे यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील संगीत विभाग येथे प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाल्यानिमित्त सत्कार करण्यात आला. त्यांनी सांगितले की, मी देखील परिवर्तन कॉम्प्युटर्सचा विद्यार्थी आहे. मला इथेच खुप काही शिकायला मिळाले व शाहीर वसुधा कल्याणकर यांच्या कलापथकातून संगीताची व कलेची आवड निर्माण होत गेली. वसुधा तांबे हिने विद्यार्थी व पालकांना उद्देशून सांगितले की, विद्यार्थ्यांना आपले उच्च ध्येय गाठायचे असेल तर सोशल मीडियापासून दूर राहून आपल्या अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करावे. पूजा टेके हिने सांगितले की, एनसीसीमध्ये असतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. हिणवले गेले पण तिने हार मानली नाही म्हणून कोणत्याही अडचणी आल्या तरी विद्यार्थ्यांनी खचून न जाता स्वतःवर विश्वास ठेवावा असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वसुधा

कल्याणकर यांनी परिवर्तन कॉम्प्युटर्सच्या उपक्रमाची माहिती देऊन विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला पाहिजे यासाठी विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातात असे सांगितले. मान्यवरांच्या हस्ते करण पवार, स्वामी घुले, पिंपळे, मानसी थुटे, वैष्णवी समुद्रे यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. सोमनाथ बीर, टेके, प्रशांत वाव्हळे, आदिती भालेकर, प्रीती शेरे, प्रियंका टेके, कमलेश पारवे, यांच्यासह विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिवसा घरफोडी करणारा आरोपी जेरबंद

## दोन घरफोडीचे गुन्हे स्थानिक गुन्हे शाखेने केले उघड

बीड ।प्रतिनिधी

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, दिवसा घरावर दरोडा टाकणारे आरोपी अमोल गणेश रांजवन व आकाश भोसले हे दोघे दरोड्यातील आरोपी असून ते घराच्या अंगणात बसलेले आहेत.गुप्त माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ धाड टाकून आरोपींना ताब्यात घेतले असता आरोपीने दोन घरपोळ्या केल्याचे कबूल केले त्यांच्याकडून आणखीन गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे या कामगिरीबद्दल पोलिसांचे कौतुक होत आहे.

दिनांक १४..११.२०२५ रोजी पोलीस ठाणे बीड ग्रामीण मुर.नं ३९०/२०२५ कलम ३३१(१) ईतर बी.एन.एस प्रमाणे यातील फिर्यादी नामे युवराज शाहुराव बव्हाण याचे तक्रारीवरुन गुन्हा नोंद करण्यात आला होता. तसेच दिनांक १२.११.२०२५ रोजी पोलीस ठाणे पिंपळनेर गु.र.नं ३१७/२०२५ कलम ३३१(३) बी.एन.एस प्रमाणे यातील फिर्यादी अनिल भानुदास काळे पाचे तक्रारीवरुन दिवसा घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. वरील घरफोडीचे गुन्हयांचे अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने कसोशीने प्रयत्न सुरु केले होते.



दिनांक १५/११/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्तबातमीदारामार्फत माहीती मिळाली की वरील दोन्ही गुन्हे आरोपी नामे अमोल गणेश रांजवन रा माळेगल्ली बीड व आकाश भोसले या दोघांनी मिळून केली आहे. त्या पैकी अमोल गणेश रोजवन हा त्याचे घरासमोर मोटार सायकलवर बसलेला आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावरून पोलीस निरीक्षक श्री शिवाजी बंटेवाड यांनी तात्काळ पोलीस उपनिरीक्षक श्री श्रीराम खटावकर यांची टिम रवाना केली. नमुद बातमीचे ठिकाणी स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी सदरील ठिकाणी गेले असता अमोल रांजवन हा त्याचे घरासमोर मोटार सायकलवर बसलेला दिसुन आला त्यास ताब्यात घेवुन त्याचे नांव गांव विचारले असता त्यानी त्याचे नांव अमोल गणेश रांजवन वय ३५ वर्ष, रा माळेगल्ली बीड असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे पिंपळनेर येथे केलेल्या दिवसा घरफोडी बाबत विचारपुस केली असता त्याने सदरील घरफोडी त्याचा मित्र आकाश भोसले रा शिवाजीनगर या दोघांनी मिळून केल्याचे सांगीतले. त्यास अधिक चौकशी केली असता त्याने पोलीस ठाणे बीह ग्रामीण गु.र.नं ३९०/२०२५ कलम ३३१(१) बी.एन.एस हा देखील गुन्हा केल्याचे कबुली दिली व या मध्ये चोरीस गेलेल्या मालापैकी ९६००० रु सोन्याचे दागीणे व गुन्हयात वापरलेली मोटार सायकल अशी एकुण १,४६,०००/- रु मुद्देमाल जप्त करुन आरोपी व मुद्देमाल पुढील तपासकामी पोलीस ठाणे पिंपळनेर याचे ताब्यात देण्यात आला आहे.

सदरील कामगिरी हि श्री नवनित काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, श्री शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार राहुल शिंदे, सोमनाथ गायकवाड, पोलीस अंमलदार आश्पाक सय्यद, मनोज परजणे चालक पोलीस हवालदार नितीन वहमारे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे.



# सेवानिवृत्त तहसीलदार साहेबरावजी चव्हाण यांची उपमहासंचालक कलशेट्टीने घेतली सदिच्छा भेट

आष्टी (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्याचे मृद व जलसंधारण विभागाचे सेवानिवृत सचिव तथा सेवानिवृत जिल्हाधिकारी सुनिल चव्हाण आणि मुर्शदपूरचे माजी सरपंच संतोष भैय्या चव्हाण यांचे वडील सेवानिवृत्त तहसीलदार साहेबरावजी चव्हाण (काका) यांना (वय ८६) वृद्धावस्थेत आहेत. त्यांच्या प्रकृतीची पायल बंगल्यावर येऊन यशदा पुणेचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी चौकशी करुन सदिच्छा भेट दिली.

यावेळी कलशेट्टी यांचे मुर्शदपूरचे माजी सरपंच संतोष भैय्या चव्हाण, सौ. विद्या चव्हाण यांनी पुस्तक भेट देऊन स्वागत केले. यावेळी यशदा पुणेचे आनंद पुसावळे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगीता पाटील, आष्टीचे गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने उपस्थित होते. कलशेट्टी यांनी आवर्जून भेट घेत जुन्या काळातील आठवणींना उजाळा देत त्यांच्याशी हसतमुख हितगुज केले. जुन्या काळातील आठवणींना उजळता यावा आणि चर्चेतून त्यांना आनंदी ठेवावे अशी चर्चा झाली. सेवानिवृत तहसिलदार साहेबराव चव्हाण यांच्या काळातील राजकीय, सामाजिक, धार्मिक, वैचारिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आदीसह प्रशासनातील विविध किस्से आणि आठवणी यावेळी ताज्या केल्या. सेवानिवृत कलेक्टर सुनिल चव्हाण यांचे वडील सेवानिवृत तहसिलदार साहेबराव चव्हाण (काका) यांचे वयाचे ८५ वर्षे झाले आहेत.



आष्टी - पत्रकार तथा युवा उद्योजक अक्षय विधाते यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतांना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष जावेद पठाण, जेष्ठ पत्रकार निसार शेख, माजी सरपंच विठ्ठल राख, राजु सानप, राजेंद्र लाड, संतोष नागरगोजे, अशोक गोल्हार, पवन विधाते, सुरज शिंदे, दत्ता म्हस्के, शत्रुघ्न तोडकर, सार्थक बनकर, सिराज सय्यद आदी दिसत आहे.



आष्टी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान संवाद मेळाव्यास विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे व ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे आले असता क-हेवडगावचे सरपंच तथा कडा कृ. उ. बा. समितीचे संचालक परिवंत गायकवाड यांनी दोन्ही नेत्यांचे स्वागत करुन सत्कार केला. यावेळी त्यांच्या समवेत युवानेते जयदत्तभैय्या धस, जयदीप गायकवाड, राजेंद्र बोराडे, सचिन ससाणे हे उपस्थित होते.

# राष्ट्रीय परिषदेचे औचित्य साधून राष्ट्रीय खेळाडूंचा गौरव

आष्टी (प्रतिनिधी)

कडा ता. आष्टी येथील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) उच्च शिक्षणात सक्षम परिवर्तन - अध्ययन, अध्यापन आणि प्रशासन या विषयावर राष्ट्रीय परिषद उत्साहात संपन्न झाली. या परिषदेमध्ये राष्ट्रीय खेळाडू बाळासाहेब शेंदुरकर सर यांनी आपला शोधनिबंध प्रभावीपणे सादर केला. त्यांच्या या उल्लेखनीय सादरीकरणाबद्दल त्यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.




कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. प्रा. बापू खैरे सर, मार्गदर्शक प्रा. डॉ. गोपीनाथ बोडखे सर, प्रा. डॉ. दत्ता बोडखे सर तसेच असलम शेख सर आणि इतर मान्यवर उपस्थित होते. शेंदुरकर सरांच्या शोधनिबंधातील विषयवैशिष्ट्ये, त्यांची अभ्यासपूर्ण मांडणी आणि उच्च शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्तेचे वाढते महत्त्व यावर सर्व मान्यवरांनी प्रशंसोद्गार व्यक्त केले. कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक आणि संशोधक यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. महाविद्यालयाच्या शैक्षणिक उपक्रमात भर घालणारी ही राष्ट्रीय परिषद अत्यंत यशस्वी ठरली.

# आज बालकीर्तनकार सोहम महाराज सातपुते यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र रामतीर्थ (ता. बीड) येथे प.पू. महायोगी दादा महाराज खडकीकर यांच्या विसाव्या पुण्यतिथीनिमित्त धार्मिक उत्सवाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. दरवर्षीप्रमाणे श्रद्धा, भक्ती आणि हरीनामाच्या गजरात सुरू होणार्या अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात यंदा दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी झाली. सप्ताहाचे औचित्य साधत विविध आध्यात्मिक कार्यक्रम, प्रवचने, कीर्तन आणि भजन मंडळांच्या सेवा सुरू असून परिसरात दिंडी, नामा-घोष आणि धार्मिक शिस्तीने वातावरण भारावून गेले आहे.

या आध्यात्मिक सप्ताहातील प्रमुख आकर्षण म्हणून दि. १७ नोव्हेंबर, रात्री ९.०० ते ११.०० या वेळेत प्रसिद्ध बालकीर्तनकार ह.भ.प.सोहम महाराज सातपुते यांचे प्रभावी हरिकीर्तन आयोजित करण्यात आले आहे. अल्पवयातही संत परंपरेचा गाढा अभ्यास, ओजस्वी आवाज, समजूतदार विचार आणि मनाला स्पर्श करणारी निरूपणे यामुळे सोहम महाराजांची किर्तनसेवा संपूर्ण जिल्ह्यात लोकप्रिय झाली आहे. कार्यक्रमाची तयारी अंतिम टप्प्यात असून रामतीर्थ परिसरात भाविकांची मोठी गर्दी अपेक्षित आहे. पांडुरंगाच्या नामस्मरणात हरएक भक्ताने सहभागी व्हावे, कीर्तनातून अध्यात्मिक ऊर्जा व संस्कारांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक विद्यागुरु खडकीकर यांनी केले आहे. सप्ताहादरम्यान रामतीर्थ परिसरात स्वच्छता, पाणी, प्रसाद, बसण्याची व्यवस्था आणि सर्व सुविधा उत्तम प्रकारे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. स्थानिक सेवेकर्यांचा उत्साह व भक्तांच्या सहभागामुळे वर्षानुवर्षे हा कार्यक्रम अधिक भव्यतेने साजरा होत आहे.



आजच्या सोहम महाराज सातपुते यांच्या कीर्तनासाठी सर्व भक्तांनी उपस्थित राहून हरीनामाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.




मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड तालुका काँग्रेस कमिटीच्या जनसंपर्क कार्यालयात माजी आमदार तथा काँग्रेस जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगर यांनी होऊ घातलेल्या मुखेड नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून काँग्रेस महाविकास आघाडीच्या वतीने उच्चशिक्षित डॉ.सौ.दिपाली श्रावण रॅपनवाड यांची घोषणा केली.मुखेड शहरातील नागरिक हे सेक्युलर ओबीसी विचारसरणीचे असून घोषित केलेला उमेदवार हा सर्वसामान्य जनमानसात राहून काम करणारा कार्यकर्ता आहे. येणाऱ्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदाचे उमेदवार डॉ दिपाली श्रावण रॅपनवाड यांच्यासह शहरातील सर्व प्रभागातील काँग्रेस,महाविकास आघाडी व मित्र पक्षाच्या उमेदवारांना निवडून आणण्याचे आवाहन माजी आमदार हनुमंतराव पाटील बेटमोगरेकर यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस महासचिव डॉ. श्रावण रॅपनवाड, काँग्रेस शहराध्यक्ष हनुमंत नारनाळीकर, शिवसेना उबाठा शहर प्रमुख शंकर चिंतमवार, वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष बबलू भाई मुल्ला, काँग्रेस मागासवर्गीय सेलचे शहराध्यक्ष बालाजी साबने सह तालुक्यातील व शहरातील पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित राहून नगराध्यक्ष पदाचे उमेदवार डॉ.दिपाली श्रावण रॅपणवाड यांचे अभिनंदन केले.

या पत्रकार परिषदेत मुखेड बजरंग नगर येथील उच्चशिक्षित विचारवंत युवक मारोती लिंगूराम पवार यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश घेतला. जिल्हाध्यक्ष हनुमंतराव पाटील बेटमोगरेकर यांनी त्यांना प्रवेश देऊन स्वागत केले.

# प्रभाग १४ अ मधून बहुजन समाज पक्षाच्या वतीने सतीश कापसे यांचा अर्ज दाखल

बीड ।प्रतिनिधी

प्रभाग १४ अ मधून बहुजन समाज पक्षाच्या वतीने सतीश कापसे यांचा अर्ज नगर परिषद निवडणूक अधिकारी यांच्या कडे दाखल करण्यात आला. बहुजन समाज पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अँड सुनील डोंगरे, जिल्हाध्यक्ष डॉ अनंत गायकवाड यांचे वतीने अधिकृत नगर परिषद सदस्य म्हणून उमेदवारी जाहीर करण्यात आली.नगर परिषद निवडणूक अधिकारी यांच्याकडे



अर्ज सादर करताना उपस्थित उमेदवार सतीश कापसे. यावेळी भास्कर कांबळे, लखन डोंगरे, रविकुमार उपस्थित होते.

# नीलम ताई गोऱ्हे व अण्णा बनसोडे यांच्या हस्ते दैनिक समर्थ गांवकरी दिवाळी अंकाचे प्रकाशन!

पिंपरी चिंचवड ।प्रतिनिधी

पुणे-पिंपरी चिंचवड येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने आयोजित भव्य पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. पत्रकारिता, साहित्य, सामाजिक कार्य आणि लोकसंपर्क या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

या सोहळ्यात विधानसभा उपसभापती नीलम ताई गोऱ्हे व विधान परिषदेचे उपसभापती अण्णा बनसोडे यांच्या हस्ते दैनिक समर्थ गांवकरी दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले यावेळी त्यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी दिवाळी अंक, घड्याळ आणि शाल देऊन बहुमानपूर्वक सत्कार केला. कार्यक्रमात साहित्य, कला आणि पत्रकारितेतील दिग्गजही उपस्थित होते. ज्येष्ठ गझलकार भीमराव पांचाळे, पद्मश्री पुरस्कार विजेते प्रभू हरणे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, मराठवाडा विभागीय




अध्यक्ष अनिल सावंत, तसेच संघाचे ब्रँड अँबेसिडर संजय फुलसुंदर या मान्यवरांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली.कार्यक्रमादरम्यान पत्रकारितेच्या सामाजिक भानाची, तसेच ग्रामीण पत्रकारितेच्या योगदानाची विशेष दखल घेण्यात आली.संघटनेतर्फे विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.या पुरस्कार सोहळ्याने पत्रकार आणि साहित्य क्षेत्रातील कार्यकर्त्यांमध्ये प्रेरणा, उत्साह आणि नवचैतन्य निर्माण केले.



**कळंब ।प्रतिनिधी**

**तालुक्यातील शिराढोण हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक अभियान अंतर्गत काल दिनांक १३११२५ रोजी शिराढोण बस स्थानक पाहणी तपासणीसाठी सोलापूरचे विभाग निमंत्रक श्री गोजिरी साहेब व त्यांच्या सहकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.**

**बस स्थानकवर असलेली स्वच्छता स्थानकाचे इमारत विद्यार्थी पास सुविधा याबद्दल समाधान व्यक्त करून शिराढोण पुणे ही बस सेवा सुरू केल्याने अंगार प्रमुख स ध खटाळ वाहतूक निमंत्रक प्रशांत नानजकर अभिनंदन केले. परिसरातील लोकांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान केले ग्रामस्थांच्या वतीने साप्ताहिक ऐलान पत्रकार ताजखापठाण म्हणून मुन्ना तापडिया माझी ग्रामपंचायत सदस्य शौकत भाई कुरेशी माझे ग्रामपंचायत सदस्य दीपक सहाणे अमोल साठे आसरा पठाण राजाभाऊ वाघमारे यांनी समिती सदस्य गोजारी साहेब यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला आहे व सर्व उपस्थित होते.**

# धर्मवीर संभाजी हायस्कूलचा ऐतिहासिक उपक्रम जालना जिल्ह्यातील पहिले माजी विद्यार्थी संघ स्थापन

## जुन्या विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात भावनिक क्षणांनी पाणावले डोळे

फारुक शेख :- अंबड तालुक्यातील डोमेगाव येथील धर्मवीर संभाजी हायस्कूलने इतिहास रचला आहे. शासनाच्या आदेशानुसार सन १९९७ पासून आतापर्यंत शिक्षण घेतलेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांचा भव्य मेळावा घेऊन जिल्ह्यातील पहिला माजी विद्यार्थी संघ' स्थापन करणारे हे जालना जिल्ह्यातील पहिले विद्यालय ठरले आहे.



शैक्षणिक व भौतिक विकासासाठी माजी विद्यार्थ्यांचे योगदान अधिक प्रभावी ठरावे यासाठी उचललेले हे पाऊल विद्यालयासाठी महत्त्वाचे व परिवर्तन घडवून आणणारे मानले जात आहे.जुन्या आठवणींचा महापूर शिक्षक व विद्यार्थी भावूक २५ वर्षांहून अधिक काळानंतर एकाच छत्राखाली शेकडो माजी विद्यार्थी जमले.१९९७ ते २०२४ या काळातील विविध बॅचचे विद्यार्थी जुन्या आठवणींना उजाळा देताना अनेकांचे डोळे पाणावले.

शाळेच्या पहिल्या बॅचमधील विद्यार्थ्यांनी श्रीमती मिठे मॅडम यांच्यासोबत पुन्हा एकदा वर्गात बसत २५ वर्षांपूर्वीचे क्षण पुन्हा जगले.हा भावनिक क्षण पाहून सभागृहात उपस्थित सर्वांचे डोळे टिपूर झाले.मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून माजी मुख्याध्यापक सी.एस.मेटकर संस्थेचे सचिव विनायक चोथे केंद्रप्रमुख पांगारकर सरपंच डॉ.अशोक काळबांडे तसेच शिक्षक मिठे मॅडम,ढवळे सर,नाटकर सर,माळोदे सर, कल्याण जायभाये सर यांची मानाची उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक जगन दुर्गे होते.त्यांनी माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्यामागील शासनाची भूमिका स्पष्ट करत विद्यार्थ्यांना आपल्या परीने शाळेसाठी हातभार लावण्याचे आवाहन केले.या आवाहनास माजी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासन दिले. शाळेसाठी शिष्यवृत्ती व पुस्तकांची भेट संतोष शेळके यांचा पुढाकार शाळेचे माजी विद्यार्थी व ग्रंथपाल श्री. संतोष शेळके यांनी हायस्कूलच्या ग्रंथालयासाठी महत्त्वपूर्ण पुस्तकांची भेट दिली. तसेच विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी पुढीलप्रमाणे शिष्यवृत्तीसुद्धा जाहीर केल्या: आठवीमध्ये प्रथम येणाऱ्यास ३,००० रुपये नववीमध्ये प्रथम ५,००० रुपये,दहावीमध्ये प्रथम १०,००० रुपये,अनेक विद्यार्थ्यांनी शाळेला आवश्यक सुविधा पुरविण्यासाठी मदत करण्याची तयारी दर्शवली. विद्यार्थी संघाची निवड प्रदीप लेकरवाळे अध्यक्षपदी शासनाच्या आदेशानुसार स्थापन करण्यात आलेल्या माजी विद्यार्थी संघात विधीज्ञ प्रा. प्रदीप लेकरवाळे यांची सर्वानुमते अध्यक्षपदी,राम चोथे यांची उपाध्यक्षपदी,तर गजानन गोधे यांची कोषाध्यक्षपदी निवड झाली.नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा शिक्षक व माजी विद्यार्थ्यांनी सत्कार करून त्यांचे हार्दिक अभिनंदन केले. शाळेच्या नव्या अध्यायाची सुरुवात या ऐतिहासिक मेळाव्यामुळे धर्मवीर संभाजी हायस्कूलमध्ये एकात्मता, कृतज्ञता,आणि शैक्षणिक विकासाचा नवा संकल्प जागृत झाला आहे. माजी विद्यार्थी संघाच्या स्थापनेने शाळेच्या प्रगतीचा नवा अध्याय सुरू झाला असून जुन्या-नव्यांच्या एकत्र येण्याने शाळेला मिळालेली ऊर्जा आगामी शैक्षणिक प्रवासात निश्चितच मोलाची ठरणार आहे.




# राजा टाकळी शिवारात बिबट पिल्लू आढळल्याची खळबळ; वन विभागाचा तात्काळ धाव

## तपासणीत समोर आली खरी बाब

घनसावंगी ।प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे राजा टाकळी गट क्र. १९०परिसरात सकाळी अचानक खळबळ उडाली.श्री विठ्ठल दगडू ढिसले यांच्या शिवारात बिबट्याच्या पिल्लूसारखा दिसणारा प्राणी मूर्त अवस्थेत पडलेला असल्याची माहिती फोनद्वारे मिळाली आणि परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

माहिती मिळताच वन विभागाचे एस.एन.पठाण वनपाल,मंठा, के.जी.जाधव वनरक्षक, घनसावंगी व रामेश्वर राठोड वन मजूर यांनी कोणतीही वेळ न दवडता घटनास्थळी धाव घेतली. ठिकाणाची पाहणी केल्यानंतर मात्र या घटनेचा खरा तपशील समोर आला मूर्त अवस्थेत पडलेले पिल्लू हे बिबट्याचे नसून साध्या मांजरीचे असल्याचे निष्पन्न झाले.अफवा आणि भीतीने हादरलेल्या गावकऱ्यांना तसेच परिसरातील ऊसतोड कामगारांना वन कर्मचाऱ्यांनी घटनास्थळीच वन्यप्राणी जनजागृती करून योग्य माहिती दिली.बिबट्याबाबतच्या गैरसमजांना छेद देत त्यांनी नागरिकांची भीती दूर केली आणि अशा घटना घडल्यास त्वरित वन विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले.

वन विभागाच्या या तात्काळ कारवाईमुळे गावकऱ्यांमध्ये निर्माण झालेली घबराट शांत झाली तसेच चुकीच्या अफवांना आळा बसला.स्थानिकांना दिलासा देणारी ही कारवाई वन विभागाच्या सतर्कतेचे आणखी एक उदाहरण ठरली आहे.

# अंबड-तिर्थपुरी रस्त्यावर अज्ञात वाहनाची धडक; निरपराध हरणाचा मृत्यू

## वाहनधारकांच्या बेफिकिरीमुळे वन्यजीवांचा बळी रुई शिवारात खळबळ

तिर्थपुरी ।प्रतिनिधी

अंबड-तिर्थपुरी मार्गावर आज पुन्हा एकदा बेफिकीर वाहनधारकांच्या निष्काळजीपणाने वन्यजीवांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह उभं केलं आहे.अंबड तालुक्यातील रुई शिवारात शनिवारी दुपारी सुमारे ३ वाजता एका निरपराध हरणाचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह आढळून आला. अज्ञात वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत हरणाचा जागीच झालेला मृत्यू पाहून परिसरातील नागरिकांत हळहळ आणि संतापाची भावना व्यक्त होत आहे.घटनास्थळी पोहोचलेल्या स्थानिकांनी सांगितले की जंगलपट्टयालगतचा हा मार्ग दिवसेंदिवस वाहनधारकांच्या बेफाम वेगाचा बळी बनत असून त्याचा सर्वाधिक फटका वन्यप्राण्यांना बसत आहे. रस्त्याच्या कडेला तडफडून मृत पडलेले हरण पाहून मानवतेलाही




लाजवेल अशी अवस्था निर्माण झाली होती.माहिती मिळताच वनविभागाचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अंबडचे वनरक्षक यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की अज्ञात वाहनाने धडक दिल्याने हरणाचा मृत्यू झाला असून पंचनामा व सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मृत हरणाची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात आली आहे.

वेगाचे वेड वन्यजीवांसाठी घातक

अंबड-तिर्थपुरी मार्गावर जंगल क्षेत्रालगत वाहने वेगाने धावण्याचे प्रमाण वाढत असून अशा घटना वारंवार घडत आहेत.वन्यप्राणी रस्ता ओलांडताना कोणत्याही क्षणी दुचाकी-चारचाकींच्या चाकाखाली येऊन जीव गमावत असल्याचे गंभीर चित्र समोर येत आहे.वनविभागाचे आवाहन वेग कमी ठेवा जीव वाचवा

वनविभागाने नागरिकांना स्पष्ट शब्दांत इशारा देत आवाहन केले आहे जंगल परिसरातून जाताना वाहनांचा वेग नियंत्रित ठेवा वन्यप्राण्यांच्या जीविताला धोका पोहोचेल अशी कोणतीही कृती टाळा वन्यजीव संरक्षण ही सामूहिक जबाबदारी असल्याची जाणीव ठेवा ही घटना पुन्हा एकदा अधोरेखित करते की मानवी बेफिकीरीमुळे निसर्गातील निरपराध जीवांवर संकट कोसळत आहे. प्रशासनानेही या मार्गावर वेगमर्यादा,चेतावणी फलक आणि गस्त यंत्रणा वाढवण्याची गरज असल्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

### सिडको परिसरातील संभाजी चौक भागात

# आठ दिवसापासुन पाणी पुरवठा बंद

मनपा पाणीपुरवठा विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष,आज रास्ता रोको आंदोलन..

नवीन नांदेड - नावा मनपाच्या प्रभाग क्रमांक १९ मधील सिडको परिसरातील संभाजी चौक भागासह अनेक परिसरात तांत्रिक कारणामुळे गेल्या आठ दिवसांपासून पाणीपुरवठा बंद असल्याने महिलांसह नागरीकांना पाण्या अभावी त्रस्त झाले असून मनपा प्रशासनाने केवळ एका टँकरने पाणीपुरवठा केला असुन संबंधित पाणीपुरवठा अभियंता यांनी दुर्लक्ष केल्याने नागरीकांना पाणी समस्यांना तोंड द्यावे लागत असुन तात्काळ पाणीपुरवठा सुरू न झाल्यास १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता बालाजी मंदिर कमान सिडको येथे मुख्य मार्गावर परिसरातील महिला , नागरिक,युवक यांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



मनपा सिडको क्षेत्रीय कार्यालय प्रभाग क्रमांक १९ मधील मुख्य मार्गावर असलेल्या जलवाहिनीतुन संभाजी चौक, जिजामाता कॉलनी, संत गाडगेबाबा महाराज नगर,वसंतराव नाईक जुनी ईमारत परिसर,व स्मशानभूमी परिसरातील अनेक भागात गेल्या आठ दिवसांपासून तांत्रिक कारणामुळे पाणीपुरवठा बंद असल्याने महिला नागरीक युवक यांच्या सह परिवारातील सदस्यांना पाण्या अभावी त्रास सहन करावा लागला, परंतु या प्रकरणी पाणीपुरवठा अभियंता यांच्या कडे संपर्क साधुन ही या कडे दुर्लक्ष करत केवळ एकच पिण्याच्या टँकरने पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला तर पाणीपुरवठा विभागाने पाच दिवसांनंतर मुख्य मार्गावर जेसीबी सहायाने खोदकाम करून तांत्रिक कारण शोधून काढत असुन अद्याप ही त्यांना यश आले नसुन पाणी पुरवठा नियमित सुरू न झाल्यास १७ नोव्हेंबर रोजी परिसरातील महिला व नागरिक युवक मोठ्या संख्येने सहभागी होत सिडको परिसरातील बालाजी मंदिर येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा आयुक्त,मनपा व ग्रामीण पोलीस स्टेशन देण्यात आले आहे .

# आज शेवटचा दिवस : अर्ज भरणाऱ्यांची गर्दी

रविवारी नगराध्यक्षपदासाठी १ तर सदस्य पदासाठी २० जणांनी भरले अर्ज

कंधार प्रतिनिधी

नगराध्यक्षपदासाठी १ तर सदस्यपदासाठी २० अर्ज दाखल करण्यात आले. रविवार पर्यंत नगराध्यक्षपदासाठी ३ तर सदस्यपदासाठी ३८ अर्ज दाखल करण्यात आले आहेत. सोमवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने अध्यक्ष व नगरसेवकपदाचे अर्ज भरण्यासाठी गर्दी होणार असून अध्यक्ष व नगरसेवकपदासाठी कोण कोण अर्ज भरले हे स्पष्ट होणार आहे.

रविवारी नगराध्यक्षपदासाठी चेतन दौलत केंद्रे यांनी अपक्ष अर्ज दाखल केला आहे. सदस्यपदासाठी २० जणांनी अर्ज दाखल केले आहेत. यात प्रभाग १ ब - मधून परशुराम धोंडीबा केंद्रे (अपक्ष), २ ब - निलेश मनोजसिंह गौर (एनसीपी), ८ ब - दिग्विजय वैजनाथ कांबळे (बीजेपी) ९ अ - राहुल गोपीनाथ ढवळे (शिवसेना) १ ब - परशुराम धोंडीबा केंद्रे (शिवसेना), १० ब - महेश नामदेव पिनाटे( शिवसेना), २ ब - निलेश मनोजसिंह गौर (अपक्ष),

१ अ - स्वाती मयूर कांबळे (शिवसेना), ५ ब - समीरउल्ला अमीरउल्ला (एनसीपी), ३ ब - संजना योगेंद्रसिंह ठाकुर (बीजेपी), ३ अ- आकाश विजय मठपती ( बिजेपी), ३ ब - कल्याबाई रामा कटकमवार (शिवसेना,) १० ब - सचिन शिवाजी श्रीरंगवार (शिवसेना), २ अ - शेख नेहा मगदूम (अपक्ष), ७ अ - कल्पना सुशांत घोडजकर (अपक्ष), ९ ब - ज्योती मारोटी पंढरे (शिवसेना), ८ ब - काशिनाथ वामन शिंदे (जनता दल), ७ ब - सैलानी महमूद पठाण (जनता दल), ६ ब - नजमा महमूद पठाण (जनता दल), ६ ब - विजयमाला उत्तम लुंगारे (अपक्ष) या २० जणांनी नामनिर्देशन पत्र दखल केले आहेत.

# अंबड नगर परिषद निवडणूक २०२५ नामांकनाची प्रक्रिया वेगात आचारसंहितेचे

## काटेकोर पालन न केल्यास कठोर कारवाईची निवडणूक अधिकाऱ्यांची इशारा

अंबड ।प्रतिनिधी

अंबड नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची औपचारिक सुरूवात होताच निवडणुकीचे वातावरण तापू लागले आहे. तहसीलदार मामलेदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी श्री. विजय चव्हाण यांनी निवडणुकीच्या प्रगतीचा आढावा घेत माहिती दिली असून नामनिर्देशन प्रक्रियेचा वेग दिवसेंदिवस वाढत असल्याचे स्पष्ट केले.दि.१५ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाकडे एकूण ८ नामनिर्देशन अर्ज दाखल झाले आहेत.यामध्ये अध्यक्षपदासाठी २ अर्ज,सदस्य पदासाठी ६ अर्ज

प्रक्रिया सुरळीत पार पडावी




तसेच उमेदवारांना अडचण येऊ नये म्हणून दि.१६ नोव्हेंबर रोजी रविवार देखील कार्यालयीन वेळेत नामनिर्देशन पत्रे स्वीकारली जाणार आहेत.नामनिर्देशन दाखल करण्याची अंतिम मुदत १७ नोव्हेंबरनिवडणूक निर्णय अधिकारी श्री. चव्हाण यांनी स्पष्ट केले कीसोमवार दि.१७ नोव्हेंबर २०२५, दुपारी ३:०० वाजेपर्यंतच नामनिर्देशन पत्रे स्वीकारली जातील.महत्त्वाची सूचनायापुढे एक सेकंदासाठीही कोणत्याही उमेदवाराचा अर्ज स्वीकारला जाणार नाही.

शेवटच्या क्षणाची गर्दी टाळण्यासाठी सर्व इच्छुक उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह वेळेपूर्वीच अर्ज दाखल करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.आचारसंहितेचा भंग केला तर कठोर कारवाई अपरिहार्यनिवडणूक जाहीर होताच संपूर्ण अंबड नगर परिषद क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी श्री. चव्हाण यांनी दिलेली सक्त ताकीद सर्व उमेदवार,पक्ष, कार्यकर्त्यांनी आचारसंहितेचे काटेकोर पालन करणे अनिवार्य. अनधिकृत प्रचार,आर्थिक प्रलोभने,सभा-जुलूस,भडकावू भाषण,बॅनर-पोस्टरचे उल्लंघन अशा प्रकारांवर शून्य सहनशीलता धोरण.कोणत्याही प्रकारचा भंग झाल्यास निवडणूक प्रशासन व संबंधित विभागांकडून तात्काळ आणि कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. निवडणूक अधिकाऱ्यांचे नागरिकांना आवाहन लोकतांत्रिक प्रतिक्रियाला साथ द्या, शांततेत व स्वच्छ वातावरणात निवडणूक पार पडू द्या, कोणतेही संशयास्पदक हालचाल दिसल्यास निवडणूक प्रशासनाला त्वरित कळवा श्री.विजय चव्हाण यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला

आचारसंहिता मोडणाऱ्याला कुठलीही सूट नाही नियम मोडल्यास कडक दंडात्मक कारवाई केली जाईल.असे आवाहन केले तहसीलदार मामलेदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी श्री विजय चव्हाण यांनी केले आहे.

# सचिन तेंडुलकर यांना भेटण्यासाठी २२ वर्षापासुन जोपासला अनोखा छंद

आष्टी (प्रतिनिधी)

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांचे चाहते सुधीर रामनाथ दरेकर राहणार घुलेवाडी तालुका संगमनेर जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर) यांनी एक आगळा वेगळा छंद जोपासला आहे.वृत्तपत्रातून प्रकाशित झालेले सचिन तेंडुलकर यांचे छायाचित्रे, लेख, माहिती इ. सन १९९९ पासून २०२२ पर्यंत जमा करून ठेवली आहे. हा संग्रह खूप मोठा आहे. त्याचे सर्व फोटो कात्रण एकत्र चीटकुन त्याचे जवळपास २५ पुस्तके बनवले आहेत. प्रत्येक पुस्तकात १०० पाने आहेत. सचिन तेंडुलकर यांना भेटून हा उपक्रम दाखवता यावा यायाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. मागील २२ वर्षापासून पेपर मधील सचिन तेंडुलकर यांचे कात्रण जमा केले ते कात्रण सचिन तेंडुलकर यांची भेट घेऊन हा संग्रह तेंडुलकर यांना दाखवण्याची सुधीर दरेकर यांची इच्छा आहे.

कोणी मदत करले का ?

मी मागील २२ वर्षांपासून वृत्तपत्रातून



प्रकाशित झालेले महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांचे छायाचित्रे, लेख, माहिती यांचे कात्रण जमा करून १०० पानी २५ पुस्तकांचे संग्रह तयार केले असून हे तेंडुलकर यांची भेट घेऊन त्यांना दाखवायचे आहे. परंतु आजपर्यंत भेट घडून आलेली नाही. तरी भेट घडवून आणण्यासाठी मला मदत करा. आर्थिक मदतीची आवश्यकता नाही. फक्त भेटण्यासाठी संपर्क करून द्यावा हिच विनंती.

### बीडच्या माध्यमिक शिक्षण विभागात खाऊगिरी वाढली

# कुणबी नोंद करण्याचे पत्र मिळवण्यासाठी मोजावे लागत आहेत पैसे



अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करा - माजी गटशिक्षणाधिकारी टेकाळे

बीड ।प्रतिनिधी

बीडच्या जिल्हा माध्यमिक शिक्षण विभागात मराठा समाजातील मुलांना कुणबी मराठा प्रमाणपत्राच्या आधारे शाळेत प्रवेश निर्गमवर नोंद करण्याच्या प्रत्रासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून मोठा त्रास होत असून पाचशे ते एक हजार पर्यंत रक्कम घेतली जात असून या खाऊगिरीची माहिती माजी गटशिक्षणाधिकारी श्रीराम टेकाळे यांना होताच त्यांनी चांगलाच संताप व्यक्त केला.

हा घडत असलेला प्रकार अत्यंत गंभीर असून जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याची दखल घेऊन माध्यमिक विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी माजी गटशिक्षणाधिकारी श्रीराम टेकाळे यांनी केली आहे.

# भगवान भोजने यांची बिनविरोध निवड

जामखेडमध्ये जल्लोषात सत्कार

जामखेड वृत्तसेवा : अंबड तालुक्यातील जामखेड गावचे महायुतीचे ज्येष्ठ कार्यकर्ते भगवान (जिजा) भोजने यांची अंबड खरेदी-विक्री महासंघाच्या संचालकपदी १४ नोव्हेंबर रोजी झालेल्या बिनविरोध निवडीबद्दल गावात जल्लोषात स्वागत करण्यात आले. अहिल्यादेवी होळकर स्मारक प्रांगणात महायुतीतर्फे (शिंदे गट - भाजप) त्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

खरेदी-विक्री संघाच्या संचालक म्हणून कृषीमाल खरेदीचे सुयोग्य नियोजन, शेतकऱ्यांना वेळेत लाभ मिळण्यासाठी खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता, सहकारी संस्थेतील आर्थिक शिस्त, शेतकरी हिताचे निर्णय, वितरण व्यवस्थेची सुधारणा तसेच शेतकऱ्यांपर्यंत शासकीय योजनांचे लाभ पोहोचवणे ही महत्त्वाची कामे त्यांच्या पुढे येणार आहेत. त्यामुळे जामखेड परिसरातील शेतकरी बांधवांमध्ये नव्या नेतृत्वाबद्दल उत्सुकता आणि अपेक्षांचे वातावरण आहे.

सत्कार प्रसंगी शिंदे सेनेचे पंकज मंडलिक यांनी भगवान भोजने (जिजा) यांना शुभेच्छा देत, जामखेडच्या विकासासाठी तसेच सहकार क्षेत्रातील पारदर्शक व शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी तुमचे नेतृत्व नक्कीच मोलाचे ठरेल, असे मत व्यक्त केले. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी त्यांच्या नवीन जबाबदारीबद्दल अभिनंदन करत खरेदी-विक्री संघाच्या कामकाजाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

या सत्कार प्रसंगी भगवान भोजने (मा. पं.स.स.), पंकज मंडलिक, सुरज पांढरे (मा.ग्रा.पं.स.), तुकाराम भोजने, रखमाजी भोजने, गणेश भोजने, दत्ता भोजने, एकनाथ मस्के, विलास राठोड, गंगा पांढरे, सचिन जाधव, मारुती पांढरे, रखमाजी भोजने यांच्यासह मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते. अहिल्यादेवी स्मारक प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमामुळे परिसरात उत्साह आणि ऐक्याचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी शिवसेना शिंदे गटा चे पंकज मंडलिक यांनी असे सांगितले की आम्ही सरकारमध्ये आहोत अनेक गोरगरिबाची कामे करण्याचा व आणि अडचणीमध्ये उभा राहण्याचा मला जो योग आला त्यासाठी मी वरिष्ठांचे आमचे पक्षश्रेष्ठ अर्जुन भाऊ खोतकर यांच्या आदेशाप्रमाणे कार्य करत राहू आणि शिवसेना शिंदे साहेब गट कसा घराघरापर्यंत लाडक्या बहिणीच्या माध्यमातून पोहोचलेला आहेच परंतु यापेक्षाही जास्तीत जास्त लोक जोडण्याचा प्रयत्न भाऊच्या आशीर्वादाने करू परंतु मित्र पक्षांनाही विनंती आहे गावातील काही विकास कामांमध्ये आम्हालाही सोबत घ्या असा संदेश पंकज मंडलिक यांनी दिला



# रुई गावात बिबट्याचा थरार गोठ्यात घुसून गाईचा फाडशा ग्रामस्थ दहशतीत पिंजरा लावण्याची मागणी जोरात

या घटनेनंतर अंबड-घनसावंगी तालुक्यातील गावात पुन्हा एकदा मानव-वाघिण संघर्षाची भीषण आठवण जागी झाली असून नागरिकांचे जीव मुठीत आल्यासारखे झाले आहेत.

फारुक शेख :- तालुक्यातील रुई येथे मध्यरात्री घडलेल्या भीषण बिबट्या हल्ल्याने गावात एकच खळबळ उडाली आहे. शेतातील गोठ्यात बांधलेल्या गाईवर बिबट्याने अतिशय निर्घृण हल्ला करत तिचा फाडशा पाडला.ही घटना १४ नोव्हेंबरच्या मध्यरात्री घडली असून सकाळी उघड झाल्यानंतर गावकऱ्यांमध्ये प्रचंड घबराट पसरली आहे.

ही घटना गावालगतच्या भागवत श्रीराम ढवळे यांच्या शेतात घडली. नेहमीप्रमाणे ढवळे यांनी गाय गोठ्यात बांधून घरी परतले होते.मात्र मध्यरात्रीच्याच सुमारास बिबट्याने थेट गोठ्यात प्रवेश करत गाईवर जीवघेणा हल्ला चढवला.बिबट्याने गाईच्या पाठीमागील भागाचे मोठ्या



प्रमाणात लचके तोडल्याने गाईचा फाडशा झाला. या हल्ल्यात शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन तपासणी केली तसेच मृत गाईचे पोस्टमार्टमही करण्यात आले. सध्या परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने शेतात जाण्यास ग्रामस्थ धजावत नाहीत.विशेषत रात्रीच्या वेळेस वातावरण आणखीनच भितीदायक झाले आहे.ग्रामस्थांनी वनविभागाकडे तात्काळ पिंजरा बसवून बिबट्याला पकडण्याची मागणी जोरदारपणे केली आहे. वनविभागाने घटनास्थळाची पाहणी करून आवश्यक ती कार्यवाही सुरू केल्याचे सांगितले आहे.या घटनेनंतर अंबड-घनसावंगी तालुक्यातील गावात पुन्हा एकदा मानव-वाघिण संघर्षाची भीषण आठवण जागी झाली असून नागरिकांचे जीव मुठीत आल्यासारखे झाले आहेत.